cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५३ | मंगळवार दि.१२ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### भारताची नवी युद्धतयारी

भारतीय संरक्षण व्यवस्थेत झालेल्या सर्वोच्च नेतृत्वबदलाकडे केवळ नियमित प्रशासकीय फेरबदल म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. देशाचे पुढील संरक्षण दलप्रमुख म्हणून एन. एस. राजा सुब्रमणी आणि नौदलप्रमुख म्हणून कृष्णा स्वामीनाथन यांची झालेली नियुक्ती ही बदलत्या जागतिक सामरिक वास्तवाची जाणीव करून देणारी घटना आहे. जगातील युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना भारतालाही पारंपरिक संरक्षण विचारसरणीतून बाहेर पडून तंत्रज्ञानाधारित आणि संयुक्त युद्धतयारीच्या नव्या युगात प्रवेश करावा लागणार आहे.

# राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेस वीस कोटींची मंजुरी

## ट्रॅक्टर खरेदीसाठी मिळणार अनुदान

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात २०२६–२७ या आर्थिक वर्षात राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना राबविण्यासाठी २० कोटी रुपयांच्या वार्षिक कृती कार्यक्रमास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. कृषी व पशुसंवर्धन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेती अवजारे तसेच ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदानाचा लाभ मिळणार आहे.

महाडीबीटी पोर्टलद्वारे या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांकडून प्राप्त अर्जांना पूर्वसंमती दिल्यानंतर लाभार्थींना त्यांच्या पसंतीनुसार खुल्या बाजारातून शेती अवजारे अथवा ट्रॅक्टर खरेदी करण्याची मुभा असेल. खरेदी करताना शेतकऱ्यांनी स्वतःच्या बँक खात्यातून चेक, डीडी किंवा ऑनलाइन पद्धतीने देयकाची रक्कम अदा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. खरेदीची रक्कम आणि आवश्यक कागदपत्रांचा तपशील महाडीबीटी पोर्टलवर अपलोड केल्यानंतर शासनाकडून मंजूर अनुदानाची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुसूचित जाती–जमाती, महिला तसेच अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरच्या किमतीच्या ५० टक्के किंवा कमाल १ लाख २५ हजार रुपये यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे. इतर शेतकऱ्यांसाठी किमतीच्या ४० टक्के किंवा कमाल १ लाख रुपये यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान म्हणून देण्यात येईल. योजनेची अंमलबजावणी करताना केंद्र शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना आणि अटी–शर्तींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. लाभार्थी निवड प्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवरील विहित कार्यपद्धतीनुसार पार पाडली जाणार असून, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे अनुदानाची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार असल्याचे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.



### उपअभियानसाठी ५०० कोटी मंजूर

पंतप्रधान राष्ट्रीय कृषी विकास योजना अंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान योजनेसाठी २०६–२७ या आर्थिक वर्षासाठी केंद्र हिस्सा ३०० कोटी आणि त्यासाठीचा अनुरुप राज्य हिस्सा २०० कोटी या प्रमाणे एकूण ५०० कोटी निधीच्या कृती आराखड्यास मंजुरी देण्यात आली आहे.



# शेतकऱ्यांच्या जमिनी परस्पर नावावर केल्या

## पुण्यातील बारा अधिकाऱ्यांवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात जमीन फेरफार प्रकरणाचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अधिकाऱ्यांना शुद्धलेखनात दुरुस्तीचा अधिकार होता. पण त्यांनी जमिनीच परस्परांच्या नावावर करुन टाकल्या आहेत. याचा फटका जमीन मालकांना बसला. याची गंभीर दखल घेत महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला आहे. या प्रकरणी पुण्यातील १२ अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम १५५ चा संपूर्ण राज्यात गैरवापर करण्यात आला आहे. या प्रकरणी आता संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई सुरु झाली आहे. त्यांनी अधिकाराचा चुकीचा वापर केला. या प्रकरणी पुण्यातील १२ लोकांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. उर्वरित लोकांवर कारवाई पुढील पंधरा दिवसांत करु, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी (दि.११ मे) दिली. ते पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. कलम १५५ चा गैरवापर ◀◀ पान २ वर

### जुलैच्या अधिवेशनात लँड टायटलिंग अ‍ॅक्ट आणणार

जुलैच्या अधिवेशनात लँड टायटलिंग अ‍ॅक्ट आणणार असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचना दिलेल्या आहेत की, राज्यात लँड टायटलिंग अ‍ॅक्ट असला पाहिजे. राज्यातील १४ कोटी जनतेच्या मालमत्ता जतन करण्याची आमची जबाबदारी आहे. आता ज्या घराचे प्रॉपर्टी कार्ड आणि जमिनीचा सात–बारा निश्चित नाही. त्याला मालकी ठरवता येत नाही. हा कायदा आल्यानंतर लोकांना प्रॉपर्टी कार्ड मिळेल. या कायद्यामुळे कायदेशीर तंटे बंद होतील. यामुळे मध्यस्थीची गरज पडणार नाही. जमिनीचा व्यवहार ऑनलाईन करता येईल. तसेच कर्ज मिळणे सुलभ होईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले.



## थोडक्यात...

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शासनाने केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र राज्य संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकारी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. शासनाने आयएएस, आयपीएस दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या महागाई भत्त्यामध्ये २ टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. पूर्वी कर्मचाऱ्यांना ५८ टक्के महागाई भत्ता मिळत होता. आता तो येथून पुढे ६० टक्के इतका होईल. सामान्य प्रशासन विभागाने ११ मे २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय (जीआर) काढला आहे. ही वाढ १ जानेवारी २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य संवर्गातील आयएएस, आयपीएस आणि आयएफएस यांसारख्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाने २२ एप्रिल २०२६ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने हे आदेश लागू केले आहेत.

### 'सोमनाथ मंदिर भारताच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक'

**मुंबई :** सोमनाथ मंदिर हे केवळ एक मंदिर नसून भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि सनातन परंपरेच्या अविनाशी आत्म्याचे प्रतीक आहे. हजारो वर्षांच्या आक्रमणांनंतरही सोमनाथ मंदिर आजही दिमाखात उभे आहे, हीच भारताच्या सनातन शक्तीची साक्ष आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. गुजरात येथील सोमनाथ मंदिरांच्या पुनर्बांधणीस ७५ वर्षे पूर्ण झाली असल्याने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ११ मे रोजी प्रभास पाटण येथे विशेष महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. याच अनुषंगाने भारतीय संस्कृती, श्रद्धा आणि परंपरेचा जागर घडवणारा सांस्कृतिक सोहळा 'सोमनाथ स्वाभिमान पर्व अतूट आस्थेचे १००० वर्ष या विशेष भक्तिपूर्ण कार्यक्रमाचे सांस्कृतिक कार्य विभागामार्फत श्री धाकलेश्वर महादेव मंदिर, मुंबई येथे आयोजन करण्यात आले. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा बोलत होते.

### गजानन महाराज मंदिर परिसरात मोबाईल बंदी

**बुलढाणा :** श्रीक्षेत्र शेगाव येथील गजानन महाराज मंदिराच्या परिसरातील पावित्र्य व शांतता अबाधित राहण्यासाठी तसेच भाविकांना शांत वातावरणात सुलभ व सुरक्षित दर्शन घेता यावे या हेतूने गजानन महाराज संस्थानने मंदिराच्या परिसरात मोबाईल वापरावर सक्त निर्बंध लागू केले आहेत. शिस्त,शांतता व स्वच्छतेसाठी प्रसिद्ध असलेल्या श्रींच्या मंदिरात दरदिवशी हजारो भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत असते.अशावेळी मोबाईलवरून बोलणे,फोटो व व्हिडिओ काढणे अशा प्रकारामुळे नेहमीच्या शांततामय व सुरळीत दर्शन व्यवस्थेवर परिणाम होत असून भाविकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मंदिर परिसरात मुख्य प्रवेशद्वारापासूनच आपला मोबाईल बंद ठेवावा लागणार आहे.

# नीटचा पेपर फुटला ; लातूर कनेक्शन?




## व्हायरल प्रश्नसंचात १०० हून अधिक मिळतेजुळते प्रश्न, चौकशी सुरू

**जयपूर । प्रतिनिधी**

वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नीट परीक्षेवर पुन्हा एकदा पेपरफुटीचे सावट निर्माण झाले आहे. ३ मे रोजी झालेल्या या परीक्षेतील प्रश्नांशी मिळता–जुळता असलेला संभाव्य प्रश्नसंच परीक्षेपूर्वीच सोशल मीडियावर फिरत होता अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणी राजस्थान पोलिसांच्या विशेष कृती दलाने सखोल चौकशी सुरू केली असून, नॅशनल टेस्टिंग एजन्सीने देखील या प्रकरणाची दखल घेतली आहे. दरम्यान, यामागे लातूर कनेक्शन असल्याचे बोलले जात आहे.

राजस्थानचे अतिरिक्त पोलीस महासंचालक विशाल बन्सल यांनी दिलेल्या माहितीनुसार, परीक्षेच्या काही दिवस आधी सुमारे ४०० प्रश्नांचा एक संभाव्य प्रश्नसंच व्हायरल झाला होता. या संचातील जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांचे १०० हून अधिक प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांशी तंतोतंत जुळणारे आहेत. हा केवळ योगायोग आहे की एखादे मोठे रॅकेट, याचा तपास पोलीस करत आहेत. यासाठी राजस्थानमधील अनेक शहरे आणि डेहराडूनमध्ये चौकशी सुरू आहे. राजस्थानप्रमाणेच महाराष्ट्रातील लातूरमधील एका नामांकित कोचिंग ◀◀ पान २ वर

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा फैसला लांबणीवर

## बीड, जालन्याची सुनावणी स्वतंत्र घेण्यास नकार; आता जुलैमध्ये होणार निर्णय

**नवी दिल्ली । वत्तसेवा**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर ५० टक्के आरक्षण मर्यादा वादावरुन टांगती तलवार कायम आहे. आरक्षण मर्यादेच्या अडचणीमुळे काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अजुनही प्रलंबित आहेत. या पार्श्वभुमीवर सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणी २१ आणि २२ जुलैला होणार आहे.



बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये निवडणूका घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आले होते. बीड आणि जालना जिल्ह्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली नाही, त्यामुळे या दोन जिल्ह्यांमध्ये निवडणूका जाहीर करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला देण्यात यावे, अशी विनंती करणारा अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आला होता. सदर अंतरिम ◀◀ पान २ वर

# राज्यावर दुहेरी संकट : उन्हाचे चटके वाढणार, अवकाळीचाही फटका

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात काही दिवसांत तापमानात मोठा चढ उतार पाहायला मिळत आहे. एकीकडे काही जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा वाढत असल्याचे पाहायला मिळत आहे. तर, दुसरीकडे काही जिल्ह्यांमध्ये अवकाळीने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे सध्याच्या स्थितीला राज्यावर वातावरणाचे दुहेरी संकट असल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक भागात वातावरण वेगळे पाहायला मिळत असून याचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे.



राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा हा ४० अंशाच्या वर गेला आहे. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी दुपारी १ ते ४ या वेळेत शुकशुकाट पाहायला मिळतो. जळगाव येथे राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. जळगाव यथे ४२.५ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. अकोला आणि मालेगाव येथे ४२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मुंबई, ठाणे, पालघर, रायगडमधील काही भाग, आणि कोकणातील मध्यवर्ती भागांमध्ये उष्ण आणि दमट हवामान असल्याने यामुळे तापमानाचा पाराही वाढत आहे. मुंबई शहरासह नवी मुंबई आणि उपनगरांमध्ये उष्मा अधिक तीव्र होत असून, त्यामुळे ◀◀ पान २ वर

# राज्यातील अधिकाऱ्यांच्या 'कान्स' दौऱ्यावर बंदी

## पीएम मोदींच्या काटकसरीच्या आवाहनानंतर महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना आणि राज्य सरकारांना खर्चात काटकसर करण्याचे आवाहन केल्यानंतर महाराष्ट्र सरकारनेही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. सरकारी खर्च कमी करण्यासाठी राज्य सरकारने अधिकाऱ्यांच्या परदेश दौऱ्यांवर निर्बंध घालण्यास सुरुवात केली असून, यंदाच्या कान्स फिल्म फेस्टिव्हलसाठी सरकारी प्रतिनिधी पाठवले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



पंतप्रधान मोदी यांनी रविवारी देशाला संबोधित करताना इंधन बचतीवर भर देत नागरिकांनी पेट्रोल–डिझेलचा वापर मर्यादित ठेवावा, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य द्यावे तसेच इलेक्ट्रिक वाहनांचा अधिकाधिक वापर करावा, ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०९ मे २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७१.५० क्विंटल | १,९१० | २,६५० | २,३२९ |
| ज्वारी/हायब्रिड: १५७.५० क्विंटल | १,७०० | ४,२३१ | २,४३१ |
| मका/लोकल: ३४.५० क्विंटल | १,४८२ | १,८१६ | १,६६९ |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ६८.०० क्विंटल | २,००० | ३,५०० | २,३०० |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# बंगालमध्ये ३१ जागांवर झाला एसआयआरचा परिणाम

## सर्वोच्च न्यायालयाचे ममता बॅनर्जींना नवीन याचिका दाखल करण्याचे निर्देश

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

पश्चिम बंगालमधील मानहानीकारक पराभवानंतर सत्तेतून बाहेर पडलेल्या ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेसने निकालासाठी एसआयआर प्रणालीला जबाबदार धरले आहे. सोमवारी (दि.११) सर्वोच्च न्यायालयात एसआयआरशी संबंधित प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान तृणमूलने सांगितले की, या प्रणालीमुळे ३१ जागांवरील निकालांवर थेट परिणाम झाला आहे.



मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने ज्येष्ठ वकील आणि टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांचा युक्तिवाद ऐकून घेतला. बॅनर्जी यांनी असा आरोप केला की, राज्यातील ३१ जागांवर विजयाचे अंतर हे मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतांच्या संख्येपेक्षा कमी आहे. बंगाल सरकारच्या वतीने बाजू मांडताना वकील कल्याण बॅनर्जी म्हणाले की, ३१ जागांवर ◀◀ पान २ वर

# बोपदेव घाट सामूहिक बलात्कार प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यासह संपूर्ण देशात गाजलेल्या बोपदेव घाट येथील अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार प्रकरणातून मोहन फडतरे याच्यासह ५ जणांची विशेष न्यायाधीश के. डी. शिरभाते यांनी ससबळ पुराव्य अभावी निर्दोष मुक्तता केली.

फडतरे याच्या वतीने अ‍ॅड. राहुल नायर यांनी कामकाज पाहिले. पीडितेने फडतरे याला प्रथमच न्यायालयात पाहिल्याचे सांगितले. तसेच, त्याची ओळख परेड घेण्यात आलेली नव्हती.



### साडेपाच वर्षांनी लागला निकाल

सीसीटीव्ही फुटेज सादर करताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन झाले नाही. फडतरे हा अपंग असल्याचे नमूद करत त्याला खोट्या गुन्ह्यात अडकवण्यात आल्याचा युक्तिवाद अ‍ॅड. ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भारताची नवी युद्धतयारी

भारतीय संरक्षण व्यवस्थेत झालेल्या सर्वोच्च नेतृत्वबदलाकडे केवळ नियमित प्रशासकीय फेरबदल म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. देशाचे पुढील संरक्षण दलप्रमुख म्हणून एन. एस. राजा सुब्रमणी आणि नौदलप्रमुख म्हणून कृष्णा स्वामीनाथन यांची झालेली नियुक्ती ही बदलत्या जागतिक सामरिक वास्तवाची जाणीव करून देणारी घटना आहे. जगातील युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत असताना भारतालाही पारंपरिक संरक्षण विचारसरणीतून बाहेर पडून तंत्रज्ञानाधारित आणि संयुक्त युद्धतयारीच्या नव्या युगात प्रवेश करावा लागणार आहे.

आज भारतासमोरचे धोके केवळ सीमांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत. चीन आणि पाकिस्तानकडून निर्माण होणारी आव्हाने आता बहुआयामी बनली आहेत. सीमावाद, दहशतवाद आणि घुसखोरी या जुन्या धोक्यांसोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन युद्ध, सायबर हल्ले, माहिती युद्ध आणि उपग्रह नियंत्रण यांसारखी नवी आव्हाने उभी ठाकली आहेत. भविष्यातील युद्ध हे रणांगणावर कमी आणि डेटा, नेटवर्क व माहितीच्या विश्वात अधिक लढले जाणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर नवीन सीडीएस राजा सुब्रमणी यांच्यासमोरचे सर्वात मोठे आव्हान म्हणजे 'थिएटर कमांड'ची प्रभावी अंमलबजावणी. भारतीय लष्कर, नौदल आणि वायुदल ही तिन्ही दलं दीर्घकाळ स्वतंत्र पद्धतीने कार्यरत राहिली आहेत. मात्र आधुनिक युद्धात वेगवान समन्वय, डेटा शेअरिंग आणि एकत्रित निर्णयप्रक्रिया अत्यावश्यक ठरते. अमेरिका, चीन आणि रशिया यांनी संयुक्त युद्धरचनेत मोठी प्रगती केली आहे. भारत अजून संक्रमणाच्या टप्प्यात आहे. त्यामुळे संरक्षण दलांमधील समन्वय वाढवणे आणि एकात्मिक युद्धतयारी उभारणे ही काळाची गरज बनली आहे.

भारतासाठी चीन हे दीर्घकालीन आणि सर्वात गंभीर आव्हान मानले जात आहे. चीनने एआय-आधारित युद्धतंत्र, ड्रोन स्वार्म, सायबर शस्त्रे आणि उपग्रह निरीक्षण यामध्ये प्रचंड गुंतवणूक केली आहे. हिंद महासागरातील त्यांची वाढती नौदल उपस्थिती आणि पाकिस्तानसोबतची सामरिक भागीदारी भारतासाठी चिंतेचा विषय आहे. भविष्यातील संघर्षात सैनिकांची संख्या नव्हे, तर तंत्रज्ञानातील वर्चस्व निर्णायक ठरणार आहे, हे चीनने ओळखले आहे. भारतानेही ही वस्तुस्थिती स्वीकारून संरक्षण क्षेत्रातील संशोधन आणि नवतंत्रज्ञान विकासाला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे.ङ्गपाकिस्तानचे पारंपरिक सामर्थ्य काही प्रमाणात कमी झाले असले तरी त्याचे सामरिक महत्त्व पूर्णपणे संपलेले नाही. चीन आणि अमेरिकेचे अप्रत्यक्ष पाठबळ त्यामागे कायम आहे. शिवाय पाकिस्तानने आता युद्धाचे स्वरूप बदलले आहे. ड्रोनद्वारे शस्त्रतस्करी, सायबर घुसखोरी, सोशल मीडिया प्रचारयुद्ध आणि अस्थिरता निर्माण करणारे डिजिटल अभियान ही त्यांची नवी शस्त्रे बनली आहेत. त्यामुळे भारताने केवळ सीमावादाच्या चौकटीत पाकिस्तानकडे पाहणे धोकादायक ठरू शकते.ङ्गया पार्श्वभूमीवर नवीन नौदलप्रमुख कृष्णा स्वामीनाथन यांची नियुक्ती विशेष महत्त्वाची ठरते. इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर आणि कम्युनिकेशन क्षेत्रातील त्यांचे कौशल्य भारतासाठी उपयोगी ठरण्याची अपेक्षा आहे. हिंद महासागरात चीनची वाढती उपस्थिती, मालदीव-श्रीलंका परिसरातील प्रभाव आणि अरबी समुद्रातील सामरिक हालचाली यामुळे भारतीय नौदलाला अधिक आधुनिक, वेगवान आणि तंत्रज्ञानसज्ज बनावे लागणार आहे. हिंद महासागरातील सामरिक वर्चस्व टिकवणे हे भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेचे प्रमुख उद्दिष्ट ठरणार आहे. भारताने 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या घोषणांना आता प्रत्यक्ष संरक्षण उत्पादनाशी जोडणे अत्यावश्यक आहे. देशाकडे प्रचंड मनुष्यबळ असले तरी तंत्रज्ञान, संशोधन आणि उत्पादनक्षमता यामध्ये अजूनही मोठी तफावत आहे. अमेरिका, चीन आणि रशिया एआय युद्धतंत्र विकसित करण्यात आघाडीवर असताना भारत अनेक महत्त्वाच्या संरक्षण उपकरणांसाठी आयातीवर अवलंबून आहे. ही परिस्थिती दीर्घकालीन राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक आहे. स्वदेशी संरक्षण उद्योग, सेमीकंडक्टर, सायबर सुरक्षा आणि ड्रोन तंत्रज्ञान यामध्ये मोठी गुंतवणूक करणे आता अपरिहार्य ठरले आहे.ङ्गमात्र केवळ लष्करी सामर्थ्य वाढवून जागतिक नेतृत्व मिळत नाही. मजबूत अर्थव्यवस्था, स्थिर लोकशाही, तंत्रज्ञानातील स्वावलंबन आणि विश्वासार्ह परराष्ट्र धोरण या घटकांवरही भारताचे सामरिक सामर्थ्य अवलंबून आहे. दक्षिण आशियातील नेतृत्व टिकवायचे असेल तर भारताने नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश आणि मालदीवसारख्या शेजारी राष्ट्रांशी संवाद, व्यापार आणि सामरिक सहकार्य अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. या देशांमध्ये वाढणारा चीनचा प्रभाव भारतासाठी सावधतेचा इशारा आहे.

राजा सुब्रमणी आणि कृष्णा स्वामीनाथन यांच्या नियुक्त्या या भारताच्या संरक्षण व्यवस्थेतील नव्या अध्यायाची सुरुवात ठरू शकतात. मात्र केवळ नेतृत्वबदल पुरेसा नाही. भारतीय संरक्षण व्यवस्थेने आता वेग, तंत्रज्ञान, समन्वय आणि स्वदेशी सामर्थ्य यांवर आधारित नवी रणनीती उभारली पाहिजे. कारण भविष्याचे युद्ध केवळ सीमांवर नव्हे, तर कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा आणि माहितीच्या विश्वात लढले जाणार आहे. त्या युद्धासाठी आजपासून सज्ज होणे हीच भारतासमोरील सर्वात मोठी राष्ट्रीय गरज आहे.

## धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा बीडमध्ये दाखवणार जिवंत देखावा

बीड । प्रतिनिधी

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त बीड सकल हिंदू समाजाच्या वतीने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवामध्ये धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा जिवंत देखावा हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

हा ऐतिहासिक देखावा गुरुवार, दि. १४ मे रोजी सायंकाळी ४ वाजता श्री कंकालेश्वर मंदिर येथे सादर करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम आणि हिंदवी स्वराज्यासाठी दिलेल्या बलिदानाचे दर्शन या देखाव्यातून घडविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. जयंती उत्सवानिमित्त शहरात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झाले असून, या ऐतिहासिक सोहळ्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बीड सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# विविध पोलीस ठाणे हद्दीमध्ये अवैध धंद्याविरुद्ध २७ जनावर कारवाई

## ५४ लाखाचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



जालना । प्रतिनिधी

जालना शहरामध्ये अवैध धंद्याविरुद्ध कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांना सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन कारवाई करणेबाबत मागदर्शन करुन सुचना दिल्या.

त्यानुषंगाने ११/०५/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, जालना पथकाने जालना जिल्हयातील वेगवेगळया पोलीस ठाणे हददीमध्ये कारवाया केलेल्या आहेत.

कल्याणकर हॉटेल बाजुला

जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागे

विघ्नहर्ता मेडीकल शेजारी

नाना राज्यकर यांच्या घरासमोर

हिस्वन ते वडीवाडी रोडलगत

नेर ग्रामपंचायत गाळयासमोर

उढाण कॉम्प्लेक्स समोर

सेलगांव शिवारात

तळणी शिवारात

शफीक सय्यद यांचे मालकीच्या जागेत

नानासाहेब कटारे यांचे मालकीच्या जागेत

सौरभ कुलकर्णी यांचे मालकीच्या जागेत कारवाया करण्यात आल्या.

जुगार खेळणाऱ्या व खेळविणाऱ्या इसमांवर-१२ कारवाया करुन रु.९,५१,०९०/- किंमतीचा मुददेमाल, अवैध दारु वाहतुक व विक्री करणाऱ्या इसमांवर ११ कारवाया करुन रु.४,०३,५२०/- किंमतीचा मुददेमाल, प्रतिबंधीत गुटखा विक्री करणाऱ्या इसमांवर ०१ कारवाई करुन रु.२४,२९२/- किंमतीचा मुददेमाल, अवैध वाळु वाहतुक करणाऱ्या इसमाविरुध्द कारवाई करुन रु.१५,२५,०००/- किंमतीचा मुददेमाल तसेच रु.२५,२६,४००/- किंमतीचा ५१,३२८ किलो वजनाचे लोखंडी सळया मालकी हक्काबाबत काहीएक पुरावा नसतांना ताब्यात व कब्ज्यात बाळगतांना विक्री करण्याच्या उददेशाने मिळून आल्याने जप्त करण्यात आला आहे. अशा प्रकारे एकुण २४ कारवाया करुन रु.५४,३०,३०२/- किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. तेघबीर सिंह संधू, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, सपोनि अविनाश गडाख, पोउपनि राजेंद्र वाघ व सर्व स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

# महानगरपालिकेत नगरसेवकाचा तमाशा

## नगरसेवकाकडून नगरसेवकाला जीव मारण्याची धमकी

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिकेत आज ठराव घेण्याच्या कारणावरून माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या गटाचे नगरसेवक महावीर ढक्का यांच्यासह ७ ते ८ जणांनी महानगरपालिका धुमाकूळ घातला तसेच नगरसेवकाला जीवे मारण्याची धमकी दिली या प्रकरणी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात याबाबत सविस्तर माहिती अशी की लक्ष्मीकांत पांगारकर कॉन्ट्रक्टर, रा. निळकंठनगर जुना जालना मी माझे वडील लक्ष्मीकांत, आई वैशाली, भाऊ ऋषीकेश, पत्नी यशोमती असे एकत्र राहतो. माझे वडील लक्ष्मीकांत पांगारकर हे जालना शहर महानगरपालीका मध्ये नगरसेवक असुन त्यांच्याकडे स्थायी समीतीचे अध्यक्ष हे पद आहे. दिनांक ११.०५.२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजताचे सुमारास जालना महानगरपालीका येथे सभागृहामध्ये माझे




वडील लक्ष्मीकांत पांगारकर व नगरसेवक महावीर ढक्का याच्यामध्ये ठराव पास करण्यावरुन बोलाचाली झाली होती. त्यानंतर महावीर ढक्का हा माझ्या वडीलांस तेरे को देख लेता बाहर असे म्हणुन सभागृहातुन निघुन गेला होता. सदर सभागृहामध्ये बोलाचाली झाल्याचे मला महानगरपालीका मध्ये समजले होते. मी महानगरपालीका येथे हजर असतांना दुपारी १२.३० वाजताचे सुमारास जालना महानगरपालीका यांचे दालनामध्ये नगरसेवक यांची बैठक सुरु असतांना मी देखील तेथे हजर होतो. त्यावेळी महावीर ढक्का, रणवीर ढक्का, संग्राम ढक्का, विक्रांत ढक्का व इतर सात ते आठ अनोळखी लोक त्यांच्यापैकी महावीर ढक्का यांच्या हातात रॉड होता. महावीर ढक्का हा त्याच्या सोबतच्या लोकासोबत महापौर यांच्या कॅबीनमध्ये घुसले व माझे वडील लक्ष्मीकांत पांगारकर यांना मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन मी त्यांना आडविण्याचा प्रयत्न केला असता तेव्हा रणवीर ढक्का हा मला ठार मारण्याचे उददेशाने खंजर घेवुन अंगावर धावुन आला तेव्हा तो मला खंजर मारणार तेव्हा मी बाजुला

सरकलो आणी तो खंजर माझा मित्र धरमसिंग रणजितसिंग ठाकुर याच्या डोळया जवळ भुवळेला लागला व त्यास दुखापत झाली त्यानंतर विक्रांत ढक्का, सागर ढक्का व इतर लोकांनी मला खाली पाडले व मला लाथाबुक्यांने मारहाण करीत असतांना बाकीचे नगरसेवक व इतर लोक सोडण्यासाठी आल्यानंतर महावीर ढक्का व त्यांचे लोक तेथुन निघुन गेले आहे.

तरी महावीर ढक्का, रणवीर ढक्का, सागर ढक्का, विक्रांत ढक्का व इतर सात ते आठ लोक यांनी माझ्या वडीलासोबत सभागृहामध्ये महावीर ढक्का यांच्यासोबत सभागृहामध्ये ठराव पास करण्यावरुन बाचाबाची झाल्याचे कारणावरुन वडीलास धमकी देवुन हातात रॉड घेवुन महापौर यांच्या कॅबीनमध्ये घुसुन माझ्या वडीलांना मारण्याचा प्रयत्न करीत असतांना मी त्यांना आडविण्याचा प्रयत्न केला असता रणवीर ढक्का हा मला जिवे ठार मारण्याचे उददेशाने खंजर घेवुन माझ्या अंगावर धावुन आला व तो मला खंजर मारतांना मी बाजुला सरकल्यांने सदरचा खंजर माझ्या मित्रास डोळ्याचे जवळ भुवळेवर लागुन दुखापत झाली तसेच विक्रांत ढक्का, सागर ढक्का व इतर लोकांनी लाथाबुक्यांने व रॉडने मला मारहाण केली आहे म्हणुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

पान ६ वरून...

### मिलियाकडून शासनाची

मागील महिन्यात शिक्षण विभागाने पत्र काढले. मात्र इतर शाळा सुरूच आहेत. विशेष बाब म्हणजे मिलिया शाळेने बोगस भाग शाळावर बोगस विद्यार्थी संख्या दाखवून मोठ्या प्रमाणात पंधरा ते वीस शिक्षकांची आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांचे बोगस शालार्थ आयडी देखील काढण्यात आले आहेत. हा सगळा प्रकार शिक्षण विभागाच्या आशीर्वादाने सुरु आहे. याबाबत मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी आवाज उठवला असून मिलिया च्या भाग शाळा बंद करून बोगस शिक्षक आणि कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करून त्यांना पडमुक्त करावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा ईशारा दिला आहे.

### सत्याचा विजय

प्रशासनाने या प्रकरणाचा अत्यंत पारदर्शक आणि निष्पक्ष तपास करून मला न्याय दिला आहे. नागरिकांनी सामाजिक प्रश्नांवर जबाबदारीने आवाज उठवला तर सत्य समोर येतेच, हे या निर्णयाने सिद्ध झाले आहे.'' किशोर भीमराव राख, सावरगाव (सोने)या निर्णयाबद्दल त्यांनी पोलीस प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.

### सौताडा विविध कार्यकारी सोसायटीच्या

प्रगतीसाठी आणि गावातील सहकार चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सौताडा विविध कार्यकारी सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी व सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन गावाच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

### घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते तातडीने

''लाभार्थ्यांनी कर्ज काढून व उधारीवर साहित्य आणून बांधकाम सुरू केले; मात्र शासनाचा निधी वेळेत न मिळाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे,'' असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे.

या समस्येचे गांभीर्य लक्षात घेता, खासदार सोनवणे यांनी पत्राद्वारे तीन प्रमुख मागण्या लावून धरल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने बीड जिल्ह्यासाठी घरकुल हप्त्यांचा विशेष निधी तातडीने मंजूर करण्यात यावा, ज्या लाभार्थ्यांचा पहिला व दुसरा हप्ता रखडलेला आहे त्यांना प्राधान्य क्रमाने निधी वितरित केला जावा आणि जिल्हास्तरावर या प्रकरणांचा विशेष आढावा घेऊन प्रशासकीय यंत्रणेला गती देण्याचे निर्देश द्यावेत, यांचा समावेश आहे. पावसाळा सुरू होण्यास आता काहीच कालावधी शिल्लक असल्याने, जर तातडीने निधी मिळाला नाही तर अर्धवट घरांचे नुकसान होण्याची शक्यताही वर्तवण्यात येत आहे.

जिल्ह्यातील गरीब नागरिकांचे घराचे स्वप्न धुळीस मिळू नये, यासाठी राज्य शासनाने या प्रकरणी तातडीने सकारात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे. खासदार सोनवणे यांनी या पत्राच्या प्रती ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, बीडचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही पाठवल्या असून, प्रशासकीय पातळीवर या हालचालींना वेग मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पान १ वरून...

### नीटचा पेपर फुटला

अकॅडमीचे काही व्हिडिओ आणि टेस्ट-सीरीजचे पेपर्स सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. या संदर्भात लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले की, अद्याप स्थानिक स्तरावर कोणताही अधिकृत तपास सुरू करण्यात आलेला नाही. मात्र, या प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याच्या चर्चेने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले की, ३ मे रोजीची परीक्षा पूर्ण सुरक्षा प्रोटोकॉल नुसारच पार पडली. संशयास्पद माहिती ७ मे रोजी उशिरा मिळाली आणि ८ मे रोजी सकाळी ती स्वतंत्र पडताळणी आणि आवश्यक कार्यवाहीसाठी केंद्रीय संस्थांकडे पाठवण्यात आली आहे. प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कष्टावर कोणताही अन्याय केला जाणार नाही, असेही एनटीएने स्पष्ट केले आहे.

### शेतकऱ्यांच्या जमिनी

केल्यामुळे अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवले आहे. त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा सरकारचा विचार आहे. संपूर्ण राज्यात पुनर्विलोकन सुरु झाले आहे. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने जमिनी नावावर करुन दिल्या आहेत, त्या संबंधित सर्व मालमत्ता पुनर्विलोकन करुन परत केल्या जातील, असेही बावनकुळेंनी स्पष्ट केले. देवस्थान इनाम जमिनींचा प्रश्न सोडवण्याबाबतही त्यांनी महत्त्वाची माहिती दिली, देवस्थान इनाम जमिनीच्या कायद्याच्या मसुदा महसूल विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड केला आहे. यावर जनतेकडून सूचना, हरकती मागवल्या आहेत. त्यासाठी महिनाभराचा वेळ आहे. त्यानंतर अंतिम मसुदा तयार होईल आणि तो आम्ही विधीमंडळ सादर करु, असे बावनकुळे म्हणाले. देवस्थानचे हक्क अबाधित ठेवून वहिवाटदाराचा काय हक्क असेल?; जे १०० वर्षांपासून वाहिवाटदार आहेत. कुळांचे हक्क काय आहेत?; हे निश्चित करावे लागेल नाही तर साडेचार लाख हेक्टर जमीन अशीच पडून राहील. समजा देवस्थानची जमीन वहिवाटदाराकडे आहे, त्याचे देवस्थानला आजच्या रेडी रेकनर दराप्रमाणे काही अंशी पैसे भरण्याची तरतूद केली जाईल. देवस्थान चालवण्यासाठी जी काही निश्चित रक्कम लागेल. त्याची तरतूद करता येईल, असा विचार असल्याचे त्यांनी नमूद केले.

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

अर्ज सोमवारी सुनावणीस आल्यानंतर आगामी सुनावणीतच हे प्रकरण बघु असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. त्यामुळे येत्या २१ आणि २२ जुलैला होणाऱ्या सुनावणीतच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांवर सुनावणी होणार असल्याचे दिसते. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीचा विषय न्यायालयात असताना काही ठिकाणी निवडणुका झाल्या आहेत. यापूर्वी ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या आहते, त्या सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन असतील, असे यापूर्वीच सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले आहे. तर इतर ठिकाणी जिथे आरक्षण टक्केवारीचे अडचण आहे तेथील निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे या प्रकरणावर न्यायालय काय भूमिका घेणार किंवा निर्णय देणार हे लक्षवेधी असणार आहे. त्यामुळे आगामी सुनावणी महत्वाची ठरणार आहे.

### राज्यावर दुहेरी संकट :

नागरिकही घराच्या बाहेर पडणे टाळत आहेत. तापमानाचा वाढता पारा लक्षात घेता आरोग्य विभागाकडून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर दुसरीकडे कोकणातील रत्नागिरीसह अन्य काही भागांत गेल्या तीन ते चार दिवसांपासून अवकाळीने धुमाकूळ घातला आहे. यामुळे आंब्यांच्या झाडांसह काजू, नारळाच्या बागांचेही मोठे नुकसान झाले आहे. हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार, पुढील काही दिवस ही स्थिती कोकणासह मराठवाडा आणि विदर्भात कायम राहणार असून, काही जिल्ह्यांना विजांसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरासह श्रीलंका आणि आखाती भागांमध्ये तयार झालेल्या चक्राकार वारे आणि त्यामागोमाग सक्रिय होणाऱ्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात बहुतांशी पूर्वमोसमी पावसासाठी पोषक वातावरणनिर्मिती झाल्याचे दिसून येत आहे. विदर्भ, मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला. पावसाचा येलो अलर्ट भारतीय हवामान विभागाने जारी केला आहे.

### राज्यातील अधिकाऱ्यांच्या

असे आवाहन केले होते. कंपन्यांनी शक्य असेल तेथे 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय द्यावा आणि अनावश्यक परदेश दौरे टाळावेत, सोने खरेदी एक वर्षासाठी टाळावे, असेही त्यांनी म्हटले होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने प्रशासकीय स्तरावर तातडीने काही निर्णय घेतले आहेत. सरकारी कामकाजासाठी आता प्रामुख्याने इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला जाणार आहे. तसेच मंगळवारपासून सर्व सरकारी बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे इंधन खर्चात बचत होण्यासोबतच परदेश दौऱ्यांवरील खर्चालाही आळा बसणार असल्याचे सांगितले जात आहे. विशेषतः कान्स फिल्म फेस्टिव्हलसाठी सरकारी प्रतिनिधी न पाठवण्याचा निर्णय हा काटकसरीच्या धोरणाचा भाग मानला जात आहे. महाराष्ट्र सरकारने प्रशासकीय स्तरावर तातडीने काही निर्णय घेतले आहेत. सरकारी कामकाजासाठी आता प्रामुख्याने इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला जाणार आहे. तसेच मंगळवारपासून सर्व सरकारी बैठका ऑनलाइन पद्धतीने घेण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

### बंगालमध्ये ३१ जागांवर

भाजपच्या विजयाचे अंतर हे एसआयआर मुळे वगळण्यात आलेल्या मतदारांच्या संख्येपेक्षा कमी आहे. ही प्रक्रिया नसती, तर या जागांचा निकाल वेगळा लागला असता. यावर न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, ममता बॅनर्जी यांच्यासह या ३१ जागांवरील उमेदवार या दाव्याच्या आधारे स्वतंत्र याचिका दाखल करू शकतात. न्यायालयाने विशेषतः ममता बॅनर्जींचे नाव घेतले कारण त्यांच्या भवानीपूर मतदारसंघाचाही यात समावेश आहे, जिथे विजयाचा फरक हा एसआयआर मुळे कापल्या गेलेल्या मतांपेक्षा कमी असल्याचे सांगितले जात आहे. २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत (विशेष पुनरीक्षण मोहीम) हा सर्वात मोठा वादाचा मुद्दा ठरला होता. या प्रक्रियेमुळे मतदानापूर्वी राज्याच्या मतदार यादीमध्ये मोठे बदल झाले. पुनरीक्षण प्रक्रियेदरम्यान सुमारे ९१ लाख नावे (एकूण मतदारांच्या १२ टक्के) मतदार यादीतून हटवण्यात आली. यापैकी ६० लाखांहून अधिक मतदारांना मृत म्हणून घोषित करण्यात आले. उर्वरित २७ लाख प्रकरणे प्रलंबित किंवा छाननीखाली राहिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन केलेल्या ल्युबियल्सनी या २७ लाख प्रकरणांपैकी केवळ काही जणांची नावे पुन्हा समाविष्ट केली.

### बोपदेव घाट सामूहिक

नायर यांनी केला. त्यांना ॲड. प्रमोद धुळे, ॲड. तेजस सोनार आणि ॲड. दीपेंद्र तुपे यांनी सहकार्य केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, साक्षीदारांचे जबाब आणि उपलब्ध पुरावे तपासल्यानंतर न्यायालयाने पीडितेच्या साक्षींमध्ये तफावत असल्याचे नमूद करत निकाल दिला. याप्रकरणी, ऑक्टोबर २०२० मध्ये पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. १५ वर्षीय पीडित आईसोबत भांडण झाल्याने घरातून निघून गेली होती. ती हरविल्याची तक्रार पोलिसात देण्यात आली होती. शोध घेतल्यानंतर ५ जणांनी सामुहिक बलात्कार केल्याचे तिने सांगितले होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि.१२ मे २०२६
३

## पाटील इलेव्हन संघाचा दणदणीत विजय

चौसाळा: वाळवड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य वाळवड प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत चौसाळा येथील पाटील इलेव्हन संघाने शानदार खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला.अंतिम सामन्यात दमदार विजय मिळवत संघाने तब्बल ७१ हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक आपल्या नावावर केले. स्पर्धेमध्ये दुतीय क्रमांक आंबी संघाने, तृतीय क्रमांक डिगुळ संघाने तर चतुर्थ क्रमांक यजमान वाळवड संघाने मिळवला.चौसाळा पाटील इलेव्हन संघाचा आक्रमक फलंदाज वैभव सोनवणे याने संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाजी करत ''मॅन ऑफ द सिरीज'' किताब पटकावला. तसेच माजी रणजी खेळाडू तथा पाटील इलेव्हन क्रिकेट क्लबचे कर्णधार डॉ. प्रशांत पाटील यांनी आपल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर ''बेस्ट बॉलर'' हा मानाचा किताब मिळवला.किरण जाधव,किशोर सोनवणे,बापू घोडके,डॉ. प्रशांत पाटील, वैभव सोनवणे, शाहेद पठाण,तेजस वाघमारे, पवन औताडे,नोहिद सय्यद,अमोल सोनवणे, शंतनू क्षीरसागर, मंगेश बोबडे,ऋषी तोडकर,अपूर्व मालकर,अजय खोबरे,रोहन तोडकर,मिलींद सोनवणे,अमोल चव्हाण, अजय सोनवणे, प्रथमेश सोनवणे, राज तोडकर संघातील सर्व खेळाडूंनी एकजुटीने आणि जिद्दीने खेळ करत चौसाळ्याचे नाव उंचावले.

# बीडमध्ये उपवर्गीकरणाविरोधात ५९ जाती उतरल्या रस्त्यावर!

## भाजप सरकार समाजात विष पेरत आहे; ४१ अंश तापमानात हजारोंचा एल्गार, जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक महामोर्चा

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून बीडमध्ये सोमवारी (ता.११) आंबेडकरी समाजाचा संताप अक्षरशः रस्त्यावर उतरला. भाजप सरकार जाती-जातीत भिंती उभ्या करून सामाजिक ऐक्य उद्ध्वस्त करत आहे, असा थेट आरोप करत १० हजार आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. तब्बल ४१ अंश सेल्सिअस तापमानाची पर्वा न करता जिल्हाभरातील अनुसूचित जाती प्रवर्गातील ५९ जातींचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, महिला आणि युवक मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले होते. बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेल्या या महामोर्चाने शहर दणाणून सोडले. उपवर्गीकरण रद्द करा, संविधान वाचवा, समाजात फूट पाडणारे निर्णय बंद करा अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. आंदोलकांच्या हातात हा लढा कोणत्याही जातीविरोधात नसून सरकारच्या विभाजनकारी भूमिकेविरोधात आहे असे ठळक फलक झळकत होते.




मोर्चेकऱ्यांनी जिल्हाधिकारी मार्फत शासनाला दिलेल्या निवेदनात उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ जाहीर करण्याची जोरदार मागणी केली. अहवाल लपवून सरकार जनतेवर निर्णय लादू पाहत आहे. आधी अहवाल सार्वजनिक करा, मगच जनतेची मते घ्या, अशी संतप्त भूमिका आंदोलकांनी मांडली.

एप्रिल महिन्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त राज्यभर विविध कार्यक्रम सुरू असल्याने नागरिकांना अभ्यासपूर्ण भूमिका मांडण्यासाठी वेळ मिळावा म्हणून सूचना व हरकती सादर करण्याची मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढवावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी आंदोलकांनी सरकारवर गंभीर आरोप करत सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला उपवर्गीकरण करणे बंधनकारक केलेले नाही. तरीदेखील सरकार हेतुपुरस्सर समाजात संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींची भूमिका जाणून घेण्यासाठी लेखक, साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनेते यांची संयुक्त समिती स्थापन करण्याची मागणीही करण्यात आली. मोर्चामध्ये केवळ उपवर्गीकरणाचाच मुद्दा नव्हता, तर कंत्राटी नोकरभरती, शिक्षणाचे खासगीकरण आणि जातनिहाय जनगणनेच्या प्रश्नांवरही सरकारला धारेवर धरले गेले. सरकारी नोकरभरतीतील कंत्राटी पद्धत बंद करा, अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष भरा, शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करून समान आणि मोफत शिक्षण लागू करा, अशा मागण्यांनी मोर्चेकऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार आक्रमक भूमिका घेतली.

### भाजप सरकारने विष कालविले

अनुसूचित जातींमध्ये जाणीवपूर्वक फूट पाडण्याचा डाव हा सामाजिक सलोख्यावर थेट हल्ला आहे. भाजप सरकार समाजात विष कालवण्याचे काम करत असून संविधानिक ऐक्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सरकारने समाज पेटविण्याचे राजकारण तात्काळ थांबवावे, अन्यथा रस्त्यावरचा संघर्ष अधिक तीव्र केला जाईल.

– आंबेडकरी समाजाचे पदाधिकारी

### वेळ पडली तर न्यायालयवरही मोर्चा काढू

उपवर्गीकरणाचा निर्णय भविष्यात मोठ्या सामाजिक संघर्षाला कारणीभूत ठरू शकतो. शासनाने जनतेच्या भावना डावलून घाईघाईने निर्णय घेतल्यास तीव्र आंदोलन उभे राहील. वेळ पडली तर न्यायालयवरही विराट मोर्चा काढून सरकारला जाब विचारला जाईल, असा सज्जड इशारा सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला.

– सामाजिक कार्यकर्ते

### संरक्षणासाठी उभारलेला एल्गार

हा महामोर्चा कोणत्याही जातीविरोधात नसून संविधान, सामाजिक ऐक्य आणि आंबेडकरी विचारांच्या संरक्षणासाठी उभारलेला एल्गार आहे. 'समाज फोडणाऱ्यांना गादीवरून खाली खेचा, संविधान वाचवा अशा घोषणा देत मोर्चेकऱ्यांनी सरकारविरोधात संताप व्यक्त केला.

– महामोर्चा संयोजन समिती

# भुकेल्यांच्या ताटात माणुसकीचा घास

## परळीमध्ये ग्लोबल विकास ट्रस्टच्या मोफत अन्नछत्र सेवेचा शुभारंभ



परळी वैजनाथ

समाजातील गरजू, शेतकरी आणि कष्टकरी बांधवांच्या पोटाची भूक भागवण्याचा मानवतेचा वसा घेत जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने परळी वैजनाथ येथे ''मोफत अन्नछत्र'' सेवेचा सोमवारी, दि. ११ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ करण्यात आला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरालगत, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर सुरू करण्यात आलेली ही सेवा अनेक गरजूंना आधार देणारी ठरणार आहे. महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर ०१ मे रोजी सिरसाळा येथे यापूर्वीच अन्नछत्र सेवेचा शुभारंभ करण्यात आला असून तेथे दररोज ९० ते १०० गरजूंना लाभ होत आहे. परळीसह परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि विविध कामानिमित्त शहरात येणाऱ्या नागरिकांची या भागात दररोज मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा कष्टकरी बांधवांना किमान एक वेळच्या अन्नाची चिंता भासू नये, त्यांच्या पोटाला अन्न मिळावे आणि माणुसकीची ऊब अनुभवायला मिळावी, या उदात्त हेतूने गुरुजींच्या आशीर्वादातून परळी वैजनाथ आणि सिरसाळा येथे ही मोफत अन्नछत्र सेवा सुरू करण्यात आली आहे.

यावेळी बोलताना जलनायक मयंक गांधी यांनी सांगितले की, ''अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. समाजातील कोणताही व्यक्ती उपाशी राहू नये, हीच आमची भूमिका आहे. मानवतेच्या भावनेतून सुरू केलेली ही सेवा समाजातील माणुसकी अधिक दृढ करेल.'' या उद्घाटन सोहळ्यास डॉ. हरिश्चंद्र वंगे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, विविध व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष माऊली फड, श्रीराम मुंडे, पाटलोबा मुंडे, नंदलाल बियाणी, पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, माजी नायब तहसीलदार बी.एल. रुपनर, बाजार समितीचे सचिव बलवीर रामदासी यांच्यासह व्यापारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्लोबल विकास ट्रस्टच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा एक नवा आदर्श निर्माण झाला असून, ''भुकेल्याला अन्न'' या संकल्पनेतून माणुसकीचा खरा धर्म जपला जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अधिक मासापूर्वी लग्नसराईची अंतिम धूम; १४ मेपर्यंत मंगल कार्यालये हाऊसफुले

आष्टी । प्रतिनिधी

शरद रेडेकर अधिक मास जवळ येत असल्याने विवाहासाठी उपलब्ध असलेल्या मुहूर्तांचा अखेरचा टप्पा सुरू झाला असून १४ मेपर्यंत तालुक्यातील सर्व मंगल कार्यालये अक्षरशः हाऊसफुल झाली आहेत. दररोज मोठ्या प्रमाणावर लग्न सोहळे पार पडत असून कडाक्याच्या उन्हाची पर्वा न करता वधू-वर पक्ष, नातेवाईक आणि पाहुण्यांची लगबग सर्वत्र पाहायला मिळत आहे.

पूर्वी लग्न म्हणजे देव-ब्राह्मणांच्या साक्षीने पार पडणारे साधे, पवित्र आणि कौटुंबिक शुभकार्य मानले जात होते. मात्र बदलत्या काळानुसार विवाह सोहळ्याचे स्वरूप पूर्णपणे बदलले असून आजचे लग्न हे केवळ धार्मिक विधी न राहता भव्यदिव्य 'इव्हेंट' बनले आहे. आकर्षक स्टेज डेकोरेशन, प्री-वेडिंग शूट, ड्रोन फोटोग्राफी, लाईव्ह व्हिडिओ कव्हरेज, डीजे, बँड, थीमवर आधारित सजावट आणि विविध प्रकारचे स्वागत समारंभ यामुळे लग्नसोहळ्याला नव्या झगमगाटाची जोड मिळाली आहे. बाजारपेठेत कोट्यवधींची उलाढाल लग्नसराईमुळे बाजारपेठेला मोठी आर्थिक चालना मिळाली आहे. सोन्या-चांदीचे दागिने, कपडे, साड्या, सूट-बूट, सौंदर्य प्रसाधने, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक्स, केटरिंग साहित्य, फुलांची सजावट, वाहन भाडे, डीजे आणि फोटोग्राफी व्यवसायात मोठ्या प्रमाणावर उलाढाल होत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, या हंगामात बाजारात कोट्यवधी रुपयांची उलाढाल झाली असून अनेक व्यावसायिकांना वर्षातील सर्वाधिक व्यवसाय याच काळात मिळत आहे. पुढाऱ्यांची धावपळ एकाच दिवशी अनेक विवाह सोहळे असल्याने विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी धावपळ सुरू आहे. प्रत्येक लग्नसमारंभाला उपस्थित राहून शुभेच्छा देण्यासाठी पुढाऱ्यांना अक्षरशः वेळापत्रक तयार करावे लागत आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत विवाहस्थळांवर त्यांची लगबग दिसून येत आहे.

उष्णतेवर मात करत उत्साह कायम मे महिन्यातील प्रचंड उकाडा आणि तापमानाचा चढता पारा याची पर्वा न करता विवाह सोहळ्यांचा उत्साह मात्र कमी झालेला दिसत नाही. वधू-वरांसह सर्व पाहुणे आनंदाने सोहळ्यात सहभागी होत असून मंगल कार्यालये, हॉटेल्स आणि लॉन्समध्ये दिवसभर गजबजलेले वातावरण पाहायला मिळत आहे. मुहूर्त नावापुरते, सोहळा मात्र भव्य पूर्वी पंचांगातील मुहूर्ताला अत्यंत महत्त्व दिले जात असे. आजही धार्मिक विधी पार पडतात; मात्र प्रत्यक्षात विवाह सोहळ्याचे नियोजन, सजावट आणि पाहुणचार यालाच अधिक महत्त्व दिले जात आहे. त्यामुळे 'मुहूर्त नावापुरता आणि सोहळा भव्यदिव्य' अशीच सध्याच्या विवाहसंस्कृतीची ओळख बनली आहे. अधिक मास सुरू होण्यापूर्वीचा हा अखेरचा विवाह हंगाम असल्याने ग्रामीण आणि शहरी भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र एकच चर्चा आहे''१४ मेपर्यंत लग्नसराईची धामधूम, त्यानंतर काही काळासाठी मंगलाष्टकांना विराम!''

# कृषीसाहित्य विक्रेता संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मनमोहन कलंत्री

बीड

देशपातळीवरील कृषी - साहित्य विक्रेता संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मनमोहन कलंत्री तर राष्ट्रीय सल्लागार म्हणून सत्यनारायण कासट यांची तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल कृषी साहित्य विक्रेता संघटना बीड जिल्हा आणि बीड तालुकाच्या वतीने या दोन्ही मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मनमोहन कलंत्री यांची तिसऱ्यांदा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड होणे हा केवळ त्यांचा सन्मान नससुन हा बीड जिल्हा आणि मराठवाड्याचा अभिमान असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले. कृषी साहित्य विक्रेता संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली. देशातील २२ बीडचे भूमिपुत्र असलेल्या मनमोहन कलंत्री यांची नुकतीच राज्यांच्या प्रतिनिधींनी हि बिनविरोध निवड केली.

त्यांच्यासोबतच सत्यनारायण कासट यांची राष्ट्रीय सल्लागार म्हणून निवड करण्यात आली. यानिमित्ताने बीडमध्ये कृषी साहित्य विक्रेते संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. बाजार समितीचे माजी सभापती अरुण डाके, जवाहर सारडा, संघटनेचे जिल्हाध्यक्ष अंगद नवले, तालुकाध्यक्ष भीमराव काळे यांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाला उपस्थित वेगवेगळ्या संघटनांचे प्रतिनिधी, समाजातील मान्यवर आणि व्यापाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करत मनमोहन कलंत्री यांच्या कार्याचा जिल्ह्याला अभिमान असल्याचे सांगितले. उपस्थित सर्वांनीच मनमोहन कलंत्री आणि सत्यनारायण कासट यांचे अभिनंदन केले. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, व्यापारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयकिशोर बियाणी यांनी केले.



**शेतकऱ्यांचे मित्र असल्याचेसमाधान – कलंत्री**

हा देश कृषिप्रधान आहे, मात्र या देशात शेतीकडे दुय्यम म्हणून पाहिले जात आहे. ज्या शेतकऱ्यांना सर्व दुय्यम समजतात तोच खऱ्याअर्थाने जगाचा पोशिंदा आहे. आणि त्या शेतकऱ्यांचे आम्ही मित्र आहोत, त्या शेतकऱ्यांसाठी आम्हाला काम करता येते याचे समाधान आणि आनंद आहे. या संघटनेच्या माध्यमातून कृषी साहित्य विक्रेत्यांचे प्रश्न सोडवले जातात, मात्र त्याहीपेक्षा अधिक काम आम्ही शेतकऱ्यांसाठी करतो असे मनमोहन कलंत्री यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले. या संघटनेच्या माध्यमातून आमचे ठिकठिकाणी सत्कार झाले, मात्र आपल्या गावात, आपल्या माणसांनी केलेल्या सन्मानाचे मूल्य फार मोठे असून हा सन्मान अधिक आनंद देणारा असल्याचे ते म्हणाले.

# बीडकरांना वेठीस धरणारा मुजोर अभियंता राजेंद्र भोपळे हटाव, बीड जिल्हा बचाव

## राष्ट्रीय महामार्गांच्या निकृष्ट कामांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांच्या निकृष्ट दर्जाच्या व संथगतीने सुरू असलेल्या कामांविरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.११ सोमवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. ''मुजोर अभियंता राजेंद्र भोपळे हटाव आणि बीड जिल्हा बचाव'' '' निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत मध्ये टाका ''अशा घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीडचे उपविभागीय अभियंता राजेंद्र भोपळे हे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांची पाठराखण करत असल्याचा आरोप करत त्यांची तातडीने हकालपट्टी करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. यावेळी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य अभियंता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई व छत्रपती संभाजीनगर यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन देण्यात आले. आंदोलनात रामनाथ खोड,शेख




युनुस, सादेक सय्यद, रामधन जमाले, प्रा . तांदळे डी.जी., डॉ.संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, हनुमान घोडके आदी सहभागी झाले होते.

बीड शहरातील महामार्ग कामांमुळे नागरिक त्रस्त बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बार्शी नाका या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाची गती अत्यंत संथ असल्याने शहरात वाहतूक कोंडी, धुळीचे साम्राज्य आणि नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळ्यात या मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली. महिनाभरात स्लॅब कोसळल्याने कामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह

अहमदनगर ते परळी राष्ट्रीय महामार्गाच्या कामादरम्यान बार्शी रोडवरील सोमेश्वरनगर समोरील नालीवर टाकण्यात आलेला सिमेंट स्लॅब अवघ्या महिनाभरात कोसळल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यामुळे संबंधित कामांच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. ''याबाबत वारंवार तक्रारी करूनही उपविभागीय अभियंता राजेंद्र भोपळे हे कंत्राटदारांचीच बाजू घेत असल्याचे दिसून येत आहे,'' असा आरोप डॉ. ढवळे यांनी केला.

भेगाळलेल्या महामार्गांमुळे अपघातांचे सत्र खामगावपंढरपूर, अहमदपूरअहिल्यानगर आणि पैठणपंढरपूर या राष्ट्रीय महामार्गांवर मोठमोठ्या भेगा पडल्या असून अनेक ठिकाणी दुचाकीस्वारांचे चाक अडकून अपघात घडले आहेत. काही नागरिकांना जीवही गमवावा लागल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. सध्या कंत्राटदारांकडून केवळ डांबर टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जात असून सिमेंट ब्लॉक कट करून दर्जेदार दुरुस्ती करण्यात यावी, तसेच निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# १० वी बोर्ड परीक्षेत जवळा माध्यमिक विद्यालयाचा निकाल ९२.३०%

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील म्हाळस जवळा गावात मागील चार दशकापासुन कार्यरत असणाऱ्या आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळ बीड द्वारा संचलित जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेचा एकूण निकाल ९२.३०% एवढा लागला आहे .

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीच्या परीक्षेला एकूण ७८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यातील ७२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ज्यामध्ये प्रामुख्याने कु.क्षितिजा रामेश्वर खांडे हिने ९०.२०% गुण मिळवून सर्वप्रथम येण्याचा मान पटकावला तर कु. शिवाणी सोनाजी सोनवणे ८९.६०% गुण व कुमारी स्नेहल सुभाष खांडे ८६.८०% या विद्यार्थिनी गुणानुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळवण्यात यशस्वी झाल्या. गुणांनुक्रमे पहिली तीनही स्थानी विद्यार्थिनीच आल्याने अभ्यासाच्या बाबतीत मुलांपेक्षा मुलीच सरस असे चित्र पुन्हा एकदा स्पष्ट झाले. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये १६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून प्रथम श्रेणीमध्ये २६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या चमकदार यशाकरता सर्व यशवंतांचे संस्था अध्यक्ष माजी आ.राजेंद्रजी जगताप साहेब , सचिव युवराजजी जगताप, ज्येष्ठ संचालक शंकररावजी जगताप, मु. अ. तथा प्राचार्य रोहिदास डोंगरदिवे, पर्यवेक्षक रमेश डोळे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# रेशीम उत्पादक राज्यांमध्ये महाराष्ट्र अव्वल

## शेतकऱ्यांसाठी कमाईचा नवा फॉर्म्युला



पुणे : पारंपरिक शेतीसोबतच पूरक व्यवसाय म्हणून रेशीम उद्योगाकडे शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येत असून महाराष्ट्राने अपारंपरिक रेशीम उत्पादनात देशात वेगळी ओळख निर्माण केली आहे. राज्यात तुती आणि टसर अशा दोन प्रकारच्या रेशीम कोशांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जात असून, यंदा राज्यात तब्बल ५ हजार ७६२ मेट्रिक टन तुती रेशीम कोशांचे उत्पादन झाले आहे. विशेष म्हणजे अपारंपरिक रेशीम उत्पादक राज्यांमध्ये महाराष्ट्राने देशात अग्रक्रम मिळविला असून राज्यात शंभर टक्के बायोव्होल्टाइन प्रकारच्या कोशांचे उत्पादन घेतले जात आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा रेशीम उद्योग आता राष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय ठरत आहे.

राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तुती लागवडीकडे वळण्यास सुरुवात केली आहे. सध्या राज्यात २३ हजार १८८ एकर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली आहे. या लागवडीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रेशीम कोशांचे उत्पादन होत असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी हा उद्योग उत्पन्नाचा नवा पर्याय बनत आहे. कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवून देणारा उद्योग म्हणून रेशीम व्यवसायाकडे पाहिले जात आहे. त्यामुळे अनेक शेतकरी पारंपरिक पिकांसोबत रेशीम उत्पादनालाही प्राधान्य देत आहेत. तुती रेशीम उत्पादनात छत्रपती संभाजीनगर विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. या विभागात ४४.९३ लाख चॉकी कीटकांचे वितरण करण्यात आले असून त्यातून तब्बल ३ हजार १३५ मेट्रिक टन रेशीम कोशांचे उत्पादन घेण्यात आले आहे. या यशामुळे मराठवाडा विभाग रेशीम उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून पुढे येत आहे. पुणे विभागात २९.१८ लाख अंडीपुंजांचे वितरण करण्यात आले. त्यातून २ हजार ९० मेट्रिक टन रेशीम कोशांचे उत्पादन झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातही शेतकरी रेशीम उद्योगाकडे वळताना दिसत आहेत. अमरावती विभागात ६.६६ लाख अंडीपुंजांचे वितरण करण्यात आले असून ४४७ मेट्रिक टन तुती रेशीम कोशांचे उत्पादन घेण्यात आले आहे. विदर्भातील काही भागांमध्येही रेशीम उद्योगाचा विस्तार होत असल्याचे चित्र दिसत आहे. चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत पारंपरिक पद्धतीने टसर रेशीम उत्पादन घेतले जाते. यंदा या भागांत १३०.७८ लाख टसर कोशांची निर्मिती झाली आहे. या कोशांपासून सुमारे ७.१२ मेट्रिक टन रेशीम धागा तयार होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जंगल क्षेत्र असलेल्या जिल्ह्यांमध्ये टसर रेशीम उद्योग ग्रामीण आणि आदिवासी भागातील रोजगाराचे महत्त्वाचे साधन बनत आहे. नागपूर विभागात १.२४ लाख अंडीपुंजांचे वितरण करण्यात आले असून त्यातून ८८ मेट्रिक टन तुती रेशीम कोशांचे उत्पादन घेण्यात आले आहे. विदर्भातील शेतकरी आता पर्यायी शेती व्यवसाय म्हणून रेशीम उत्पादनाकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. बीड येथील रेशीम कोश बाजारपेठ ही राज्यातील सर्वांत मोठी बाजारपेठ मानली जाते. येथे मोठ्या प्रमाणावर रेशीम कोशांची खरेदी-विक्री केली जाते. याशिवाय बारामती, जालना, पूर्णा आणि सोलापूर येथेही रेशीम कोश बाजारपेठा उभारण्यात आल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन विक्रीसाठी मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. कमी खर्च, कमी जागा आणि कमी कालावधीत अधिक उत्पन्न देणारा उद्योग म्हणून रेशीम व्यवसायाकडे पाहिले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी हा उद्योग समृद्धीकडे नेणारा प्रभावी पर्याय ठरत आहे.

## उसातील 'ब्लॅक बगचा' प्रादुर्भाव टाळण्यासाठी एकात्मिक नियंत्रण



ऊस पिकात 'ब्लॅक बग' म्हणजेच काळ्या किडीचा प्रादुर्भाव झपाट्याने होत असतो. या किडीचा प्रादुर्भाव साधारणतः एप्रिल ते जून या महिन्यात होतो. ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यांच्या ऊस पिकाची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

ब्लॅक बग किडीचा प्रादुर्भाव : उसामध्ये या किडीचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असते, ज्याला काळे बग असेही म्हणतात. यामुळे उसाचे पीक उद्ध्वस्त होऊ शकते. काळे बग या उसामध्ये आढळणाऱ्या किडीचे वेळीच नियंत्रण न केल्यास संपूर्ण पिकाचा नाश होऊ शकतो.

ब्लॅक बग किडीमुळे होणारे नुकसान : काळे किडे ऊस पिकाची पाने आणि देठातील रस शोषून थेट नुकसान करतात. या प्रादुर्भावामुळे पाने कोमेजतात, झाडाची वाढ खुंटते आणि उसाचे उत्पादन कमी होते. शिवाय, काळे बग उसाच्या पिवळ्या पानांचे विषाणू आणि इतर रोगजनकांचा प्रसार करू शकतात, ज्यामुळे पिकाचे होणारे नुकसान वाढते.

एकात्मिक नियंत्रण उपाय : उसाची, शेंगा, तृणधान्ये किंवा भाजीपाला यासारख्या पिकासोबत पीक फेरपालट करावी यामुळे या किडीचा प्रादुर्भावास प्रतिबंध होतो. उसाची वेळेवर लागवड, प्रतिरोधक वाणांसह आंतरपीक घेणे, नियमितपणे तण काढणे आणि योग्य माती व्यवस्थापन यासारख्या उपायांमुळे सुद्धा उसामध्ये काळ्या किडींचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्यास मदत होऊ शकते. उसावरील ब्लॅक बगचा प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी नियमितपणे पिकांचे निरीक्षण करून सुरुवातीच्या काळातच काळ्या बगचा प्रादुर्भाव शोधणे महत्त्वाचे आहे. यामुळे वेळेवर वेळेवर नियंत्रण उपाय करून होणारे जास्तीचे नुकसान टाळता येते. शेतातील ब्लॅक बगच्या संख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पिवळे चिकट सापळे किंवा स्वीप नेट वापरावे. या किडीच्या प्रतिबंधासाठी व्हर्टिसिलियम लॅकनी १.१५ टक्के डब्ल्यू. पी. ते ४००-५०० लिटर पाण्यात २.५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणात मिसळून आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने संध्याकाळी फवारणी करावी. भुंगे, ढेकूण आणि कोळी यासारखे कीटक ब्लॅक बगला खाऊन त्यांचे नियंत्रण करण्यास मदत करतात.

क्लोरपायरीफॉस २० टक्के १.५ लिटर ८०० ते १००० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारणी करावी. फिप्रोनिल (५% ईसी) ३०० मिली/एकर, बायफेन्थ्रीन (१०% ईसी) २५० मिली/एकर किंवा लॅम्बडा-सायहॅलोथ्रिन (२.५% ईसी) २०० मिली/एकर फवारणी करावी.

## खरीपात भाताऐवजी मका लागवड जास्त फायदेशीर!

देशातील शेतकऱ्यांनी आता खरीप हंगामाची तयारी सुरू केली आहे. खरीप हंगामात अनेक पिके घेतली जात असली तरी. परंतु, देशाच्या बहुतांश भागात भात किंवा मक्याची लागवड केली जाते. मात्र, शेतकरी अनेकदा संभ्रमात पडतात की मका पिकवायचा की भात? जर आपण भाताबद्दल बोललो तर ते खरीप हंगामातील मुख्य पीक आहे. देशात धानाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र धानापेक्षा मका शेती ही शेतकऱ्यांना जास्त फायदेशीर आहे.

धानाच्या तुलनेत मका लागवडीत दुप्पट नफा मिळू शकतो. मक्याचा भावही चांगला असेल तर त्याची विक्री करून शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. विशेषत: मक्यावर प्रक्रिया केल्यानंतर त्यापासून अनेक उत्पादने तयार केली जातात. त्यामुळे त्याला बाजारपेठेत मोठी मागणी आहे.

मका शेतीतील आर्थिक फायदा : मक्याची लागवड करून शेतकरी हेक्टरी ६८ हजार रुपयांपर्यंत निव्वळ उत्पन्न मिळवू शकतात. तर भातशेती करून शेतकऱ्यांना केवळ ३५ हजार रुपये प्रति हेक्टर निव्वळ नफा मिळू शकतो.

खरीपातील मका लागवडीचे फायदे : मका पिकाला खूप कमी पाणी लागते. एकीकडे मका पिकवण्यासाठी ६२७-६२८ मिमी/हेक्टर पाणी लागते, तर भात पिकवण्यासाठी सरासरी १०००-१२०० मिमी/हेक्टर पाण्याची गरज असते. मक्याचे वाढीचे चक्र भातापेक्षा कमी असते. यामुळे शेतकऱ्यांना पिकाची लवकर कापणी आणि विक्री करता येते. खरीप मक्याचे सरासरी उत्पादन ५०-५५ क्विंटल/हेक्टर आहे. तर भाताचे सरासरी उत्पादन ३५-४० क्विंटल/हेक्टर आहे. कीड व रोगाचा प्रादुर्भाव कमी: भातापेक्षा मक्यावर किडीचा प्रादुर्भाव कमी असतो आणि कीड व्यवस्थापनाचा खर्चही कमी असतो.बाजारातील उच्च मागणी आणि किमती : खरीप मका सामान्यत: रब्बी मक्यापूर्वी काढला जातो आणि पुरवठा तुलनेने कमी असताना बाजारात उपलब्ध होतो. त्यामुळे शेतकऱ्याना चांगला भाव मिळतो. पीक फेरपालटीचे फायदे: खरीप मका हे गहू किंवा कडधान्ये यांसारख्या इतर पिकांसोबत फेरपालट करून घेता येते त्यामुळे जमिनीची सुपीकता सुधारते आणि कीड आणि रोगांचा संचय कमी होतो. पीक विविधता: खरीप मका पीक घेतल्याने पिकात विविधता निर्माण करता येते. ज्यामुळे एकच पीक (उदा. भात) वाढण्याशी संबंधित जोखीम कमी होते. तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक चक्र सुधारण्यास मदत होते आणि शेतकऱ्यांना अधिक नफाही मिळतो. वरील सर्व मुद्दे लक्षात घेता शेतकऱ्यांनी या खरीपात मका लागवडीला प्राधान्य देण्यास हरकत नाही.



### जागतिक दिवस: जागतिक परिचारिका दिन

#### महत्वाच्या घटना

१३६४ : पोलंड देशातील सर्वात जुने विद्यापीठ जगीलीनियन विद्यापीठाची सुरवात झाली.
१४५९ : राठोड कुळातील राजपूत प्रमुख राव जोधा यांनी जोधपूर शहराची स्थापना केली.
१५५१ : अमेरिकेतील सर्वात जुने विद्यापीठ सान मार्कोस राष्ट्रीय विद्यापीठाची सुरवात झाली.
१६६६ : आग्रा येथे औरंगजेबाच्या दरबारात शिवाजीमहाराज व औरंगजेब यांची पहिली व शेवटची भेट झली.
१७९७ : नेपोलिअनने व्हेनिस जिंकले.
१९०९ : पुणे येथे अनाथ विद्यार्थी गृहाची स्थापना
१९१५ : भारतीय क्रांतिकारक रासबिहारी बोस यांनी जपानी नौका सानुकी मारू यातून प्रवास करून भारत देश सोडून जपान येथे आश्रय घेतला.
१९४१ : बर्लिनमधील कोनराड झुझ यांनी जगातील पहिले पूर्णतः स्वयंचलित संगणक ३ सादर केले.
१९५२ : प्रजासत्ताक भारताचे पहिले संसदीय अधिवेशन सुरू.
१९५२ : गजसिंग जोधपुरच्या राजेपदी.
१९५५ : दुसरे महायुद्ध संपल्यावर ऑस्ट्रियाने दोस्त राष्ट्रांकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९६५ : सोव्हिएट अंतराळ स्थानक लूना ५ चंद्रावर कोसळले.
१९८७ : ब्रिटीश रॉयल नेव्ही मधील एचएमएस हार्मिस हि युद्धनौका विकत घेऊन भारताने तीला आयएनएस विराट या नावाने दाखल केले.
१९९८ : केन्द्र सरकारी कर्मचार्यांचे निवृत्तीचे वय ५८ वर्षांवरुन वरुन ६० वर्षे करण्याचा केन्द्र सरकारचा निर्णय.
१९९८ : भाषातज्ज्ञ आणि वैदिक संस्कृतीचे अभ्यासक रामचंद्र नारायण दांडेकर यांना बिर्ला ॲकॅडमी ऑफ आर्ट ॲंड कल्चर या संस्थेचा जी. डी. बिर्ला आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर.
२००८ : चीनमध्ये ८.० पेक्षा जास्त तीव्रतेच्या भूकंपात ६९,००० पेक्षा जास्त लोक मारले गेले.
२०१० : एस. एच. कपाडीया यांनी भारताचे ३८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : फ्लोरेंस नाइटिंगेल, आधुनिक शुश्रुषाशास्त्राच्या संस्थापिका; ब्रिटिश परिचारिका.
१८७५ : भारतीय हिंदू धर्माचे गाढे गाढे अभ्यासक व कलकत्ता विद्यापीठाचे तत्त्वज्ञ कृष्णचंद्र भट्टाचार्य यांचे निधन.
१८९५ : भारतीय तत्त्वज्ञ जे. कृष्णमूर्ती यांचा जन्म. (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९८६)
१८९९ : ईंद्रा देवी, भारतीय योगी.
१९०५ : कृतिशील विचारवंत, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीज चे संस्थापक आत्माराम रावजी भट यांचा जन्म. (मृत्यू: १८ जानेवारी १९८३)
१९०७ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथालेखक विजयशंकर जग्नेश्वर तथा विजय भट यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९९३)
१९०७ : हॉलिवूड अभिनेत्री कॅथरिन हेपबर्न यांचा जन्म. (मृत्यू: २९ जून २००३)
१९२६ : भारतीय जनता पक्षाचे माजी कोषाध्यक्ष व राजकारणी तसचं, पश्चिम बंगाल राज्याचे २२ वे राज्यपाल वीरेंन जे. शाह यांचा जन्मदिन.
१९३० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
१९३३ : नंदकुमार महादेव नाटेकर उर्फ नंदू नाटेकर, अग्रगण्य भारतीय बॅडमिंटनपटू.
१९४५ : भारताच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे माजी अध्यक्ष, भारताचे माजी मुख्य न्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश कोनाकुप्पाकटील गोपीनाथन बाळकृष्णन यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय राजकारणी आणि तमिळनाडूचे विद्यमान मुख्यमंत्री करुप्पा गौंडर पलानीस्वामी यांचा जन्मदिन.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू शिख पांडे यांचा जन्मदिन.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८०९ : ब्रिटिश भारतीय सैन्य दलाचे वरिष्ठ अधिकारी आणि व्हिक्टोरिया क्रॉसचे प्राप्तकर्ता जनरल सर ह्यू हेनरी गफ यांचे निधन.
१९७० : नोबेल पुरस्कार विजेते जर्मन कवी आणि नाटककार नोली सॅच यांचे निधन. (जन्म: १० डिसेंबर १८९१)
१९९३ : भारतीय हिंदी भाषिक कवी शमशेर बहादूर सिंग यांचे निधन.
२०१० : तारा वनारसे, मराठी-इंग्लिश डॉक्टर, लेखिका.
२०१४ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, आणि पटकथालेखक सरत पुजारी यांचे निधन. (जन्म: ८ ऑगस्ट १९३४)


# जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा 'लसूण घास'

जनावरांच्या आवडीचा पौष्टिक चारा पीक म्हणजे 'लसूण घास'.या चाऱ्याला इंग्रजीत 'ल्युसर्न' किंवा 'अल्फाल्फा' या नावाने सुद्धा ओळखतात. लसूण घास चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने, काष्ठमय तंतू, कर्बोदके आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळतात. या चाऱ्यामध्ये १८ ते २० टक्के प्रथिने, २.० टक्के स्निग्धांश, २५ टक्के तंतू, २९ टक्के कर्बोदके, सूक्ष्म अन्नद्रव्ये, उपयुक्त आम्ले तसेच अ आणि ड जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या चारा पिकाला विशेष महत्व आहे. हे पीक तीन वर्षापर्यंत शेतात टिकते. दरवर्षी १२ ते १५ कापण्या मिळतात ज्यातून सरासरी १०० ते १२५ टन हेक्टरी हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

लागवडीतील महत्वाचे मुद्दे :

या चारा पिकाला मध्यम ते भारी, चांगला निचरा होणारी, तसेच सामू ७.५ ते ८ दरम्यान असणारी जमीन चांगली मानवते. ऑक्टोबर- नोव्हेंबर हा कालावधी लागवडीसाठी योग्य समजला जातो. हे पीक जमिनीत तीन वर्षांपर्यंत टिकणारे असल्यामुळे जमिनीची चांगली मशागत करावी लागते.

या पिकास भरपूर प्रमाणात भरखते व वरखते देणे गरजेचे आहे. मशागतीच्या वेळी हेक्टरी १५ ते २० टन शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीपूर्वी २० किलो नत्र, १०० किलो स्फुरद व ५० किलो पालाश या रासायनिक खतांची प्रति हेक्टरी मात्रा द्यावी. त्यानंतर दर तीन ते चार कापण्यांनंतर हेक्टरी ५० किलो स्फुरद खताची मात्रा द्यावी. लागवडीसाठी आरएल-८८, आनंद-२, आनंद-३, को-१ सुधारित जातींची निवड करावी. ओळीत पेरणी केल्याने खते देणे सोपे जाते. हात कोळप्याने आंतरमशागत करता येते. ओळीत बियाणे पेरणी करण्या अगोदर जमिनीमध्ये वाफे तयार करून घ्यावेत, जमिनीच्या उतारानुसार साधारणपणे ३ ते ५ मीटर रुंद व १० मीटर लांबीचे वाफे तयार करावेत. त्यानंतर एक फूट अंतरावर काकऱ्या पाडाव्यात. दोन ओळींत एक फूट अंतर ठेवून ओळीत बियाणे पेरणी केली असता हेक्टरी २५ किलो एवढेच बी पुरेसे होते. ओळीतील पेरणीमुळे हातकोळपणी यंत्राने कमी खर्चात तणनियंत्रण करता येते. पेरणीपूर्वी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम रायझोबियमची बीजप्रक्रिया करावी. बी पेरल्यानंतर पहिले पाणी हळुवार द्यावे. जमिनीच्या मगदुरानुसार पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. तुषार सिंचनाने पाणी देणे फायद्याचे ठरते. लसूण घासाची पहिली कापणी पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी करावी. पहिल्या कापणीनंतर दर २२ ते २५ दिवसांनी कापणी करावी. कापणी जमिनीपासून ५ ते ६ सें.मी. उंचीवर करावी. कापणी करताना पीक उपटून येणार नाही याची काळजी घ्यावी. शेवटच्या कापणीनंतर पिकाला ५ ते ६ दिवस पाण्याचा ताण देऊन खुरपणी करावी. पाणी देण्यापूर्वी हेक्टरी १०० किलो स्फुरदची मात्रा द्यावी. पाणी देऊन पीक बियाण्यासाठी सोडावे. लसूण घासाचे पीक ५० टक्के फुलोऱ्यात आल्यानंतर २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची फवारणी करावी. त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने पुन्हा २ टक्के डाय अमोनियम फॉस्फेटची दुसरी फवारणी करावी. यामुळे बियाणे उत्पादनात २० टक्के वाढ होते.



मंगळवार दि.१२ मे २०२६ ५

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत






# नैसर्गिक आपत्ती संदर्भात संबंधित विभागांनी तातडीने उपाययोजना राबवाव्यात - आशिमा मित्तल

## मान्सुनपूर्व आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज

जालना प्रतिनिधी

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा सामना प्रभावीपणे करण्यासाठी सर्व संबंधित विभागांना तातडीने उपाययोजना राबविण्याचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी निर्देश दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित मान्सुनपूर्व आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कांवरिया, महानगर पालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी श्रीमती पगारे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जिल्हा प्रशासनातील सर्व विभागांनी नैसर्गिक आपत्तीचा सामना प्रभावीपणे करण्यासाठी तालुका व जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सतर्क ठेवावी. तसेच जिल्हा प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या सूचनानुसार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे अद्ययावतीकरण करून संबंधित विभागांनी आवश्यक माहिती तातडीने सादर करावी. तसेच तालुका स्तरावरही स्वतंत्र आपत्ती



व्यवस्थापन आराखडे तयार करून ते जिल्हा प्रशासनाकडे सादर करावेत. जिल्ह्यातील पूरपरिस्थितीचा इतिहास लक्षात घेऊन २००५, २००६ आणि २००८ मधील पूरग्रस्त भागांचा अभ्यास करून त्या ठिकाणी विशेष दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे. पूरस्थितीत कोणत्या विभागाने कोणती जबाबदारी पार पाडायची यासाठी स्वतंत्र एसओपी तयार करण्यासाठी माहिती सादर करावी. जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात यावे. पोलीस, आरोग्य, महसूल, महावितरण, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, पंचायत राज, दूरसंचार आदी विभागांनी आपत्ती कालावधीत समन्वय ठेवून कार्य करावे. सर्व तहसीलदारांनी तालुका आपत्ती व्यवस्थापन समित्यांच्या बैठका घेवून स्थानिक पातळीवरील उपाययोजनांचा आढावा घ्यावा. पुर परिस्थितीत नागरिकांना हलविण्याची वेळ आली तर यासाठी मोठे हॉल, शाळा यांची पाहणी करुन ठेवावी तसेच पुर प्रवण गावामधील बचाव पथके तयार ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. तसेच पावसाळ्यात साथीचे आजार फैलावू नयेत, यासाठी आरोग्य विभागाने विशेष दक्षता घ्यावी. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये औषधीसाठा उपलब्ध ठेवावा. तसेच ग्रामीण भागात स्वच्छता मोहीम राबविण्याच्या सूचना देण्यात याव्यात. सर्व पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवावेत. महावितरणने पावसाळ्यापूर्वी वीजवाहिन्यांची तपासणी करून धोकादायक झाडांच्या फांद्या छाटण्याचे काम तात्काळ पूर्ण करावेत. तसेच ट्रान्सफार्मर परिसरातील स्वच्छता करुन घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्यास तातडीने दुरुस्ती पथके कार्यरत ठेवावेत. जिल्ह्यातील पाझर तलाव/साठवण तलावाची देखभाल संबंधीत विभागांनी दूरुस्ती करुन घ्यावी. नदी पात्रातील अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावीत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यातील सर्व रस्ते, पूल व नाले यांची पाहणी करून आवश्यक त्याठिकाणी तात्काळ दुरुस्तीची कामे करुन घ्यावीत. शहर व ग्रामीण भागातील जलनिस्सारण व्यवस्था सुरळीत राहण्यासाठी नाल्यांची साफसफाई करण्याचे निर्देशही देण्यात आले. जालना महानगर पालिका आणि सर्व नगरपालिकानी शहरातील गटार व्यवस्था, नाले यांचे साफसफाई करुन घ्यावी. तसेच जाहिरात फलकांची तपासणी करुन घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना त्वरित मदत मिळावी यासाठी जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्कासाठी दूरध्वनी, मोबाईल, व्हीएचएफ, इंटरनेट आणि एसएमएस यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचे आदेश देण्यात आले. गावपातळीवर आपत्ती व्यवस्थापन पथके तयार करून त्यांना प्रशिक्षण देण्याच्याही यावेळी सांगितले. अतिवृष्टी, पूर किंवा वादळाच्या परिस्थितीत नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता जिल्हा प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज असुन, आपत्तीत मदतीसाठी नागरिकांनी जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल फ्रि क्रमांक १०७७ वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. बैठकीत प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे आपत्ती व्यवस्थापन मान्सुनपूर्व आढावा बैठकीचे सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली.

# फटाके फोडणाऱ्या बुलेटच्या सायलेन्सरमुळे नागरिक त्रस्त



मंठा । प्रतिनिधी

मंठा शहरात कानठळ्या बसविणाऱ्या फटाकेफोड बुलेटच्या सायलेन्सरमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः वयोवृद्ध व लहान बालकांना तसेच पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अल्पवयीन मुलांकडूनही वाहने अंधाधुंद आणि अमर्यादित वेगाने चालवली जात असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील मुख्य रस्ता तसेच स्वामी विवेकानंद शाळा रोड परिसरात या वाहनांचा मोठ्या आवाजात होणारा सुसाट प्रवास नागरिकांच्या शांततेवर परिणाम करत आहे. काही वाहनधारकांनी कंपनीचे मूळ सायलेन्सर काढून त्याऐवजी फटाक्यांसारखा आवाज करणारे सायलेन्सर बसवले आहेत. त्यामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय, भरधाव वेगामुळे अपघाताची शक्यताही वाढली असून यापूर्वी काही दुर्घटना घडल्याचेही बोलले जात आहे. विशेष बाब म्हणजे, काही वाहनांवर नंबर प्लेट नसणे, फॅन्सी नंबर टाकणे किंवा कोऱ्या नंबर प्लेटचा वापर करणे असे प्रकारही सर्रास दिसून येत आहेत. त्यातच अल्पवयीन मुलांकडून दुचाकी चालवली जात असल्याने पालकांच्या जबाबदारीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. यापूर्वी सुद्धा अशा बुलेटस्वारांवर कठोर कारवाई करण्यात येऊन मंठा पोलिसांकडून सक्त ताकीद देण्यात आली होती. मंठा पोलिसांनी फटाके फोड बुलेट स्वार व अल्पवयीन चालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.मंठा शहरात मागील काही दिवसांपासून कर्णकर्कश आवाज करणारे सायलेन्सर बुलेट चालकांनी बसवल्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याच्या तक्रारी आल्या आहेत. लवकरच अशा बुलेट स्वारांसह अमर्यादित वेगाने वाहन चालविणाऱ्या अल्पवयीन चालकांवर कारवाई करणार असल्याचे पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांनी सांगितले.

## || थोडक्यात

### वारेगावात बिबट्याची पिल्ले आढळल्याने खळबळ

संभाजीनगर। प्रतिनिधी


फुलंब्री तालुक्यातील वारेगाव येथे उसाच्या फडात बिबट्याची दोन पिल्ले आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली. ऊसतोडणी सुरू असताना ही घटना उघडकीस आली. ग्रामस्थांसह ऊसतोड मजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसरात सतर्कतेचा इशारा दिला आहे.याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, वारेगाव येथील शेतकरी प्रदीप तेजराव जाधव यांच्या शेतात ऊसतोडणीचे काम सुरू होते. मजूर ऊस तोडत असताना अचानक उसामधून हालचाल झाल्याने त्यांनी पाहणी केली असता एक बिबट्याचे पिल्लू दिसून आले. त्यामुळे काही काळासाठी कामगारांमध्ये एकच गोंधळ उडाला. त्यानंतर पुन्हा त्याच परिसरात आणखी एक पिल्लू आढळल्याने भीती आणखीनच वाढली. घटनेची माहिती मिळताच सरपंच रत्नप्रभा संदीप बोरसे, सागर ठेंगे, प्रदीप जाधव यांनी तत्काळ वन विभागाशी संपर्क साधला. वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिसराची पाहणी करत उसाच्या फडात शोधमोहीम सुरू केली. मादी बिबट्या आसपास असण्याची शक्यता लक्षात घेऊन वनविभागाने विशेष खबरदारी घेतली. दिवसभर वनविभागाचे कर्मचारी घटनास्थळी ठाण मांडून होते. परिसरात बिबट्याचा वावर आहे. यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणे टाळावे, लहान मुलांना एकटे सोडू नये आणि कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले. सायंकाळच्या सुमारास एक पिलू अचानक उसाच्या फडात पळून गेल्याची माहिती समोर आली. तर दुसरे सुरक्षित राहावे यासाठी त्याला त्याच ठिकाणी कॅरेट खाली झाकून ठेवण्यात आले आहे. मादी बिबट्या रात्रीच्या वेळी परत येऊन पिल्लाला घेऊन जाईल, अशी शक्यता वन विभागाने व्यक्त केली आहे.

### लातुरात सव्वा कोटीचे अमली पदार्थ नष्ट

लातूर : जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेकडून विविध ४५ गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेला तब्बल १ कोटी १८ लाख २७ हजार रुपयांचे अंमली पदार्थ शुक्रवारी कायदेशीर आणि शास्त्रोक्त पद्धतीने जाळून पूर्णपणे नष्ट करण्यात आले.यात ७१३.९२ किलो गांजा, २१.२०० किलो अफू आणि ९६ ग्रॅम एमडी ड्रग्ज यांचा समावेश होता. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. लातूर जिल्हा पोलीस दलाने मागील काही महिन्यांत अंमली पदार्थांची लागवड, वाहतूक, विक्री आणि सेवन याविरोधात सातत्याने विशेष मोहिमा राबवत मोठ्या प्रमाणावर कारवाया केल्या होत्या. त्या कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेला गांजा, अफू व इतर अंमली पदार्थ न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून नष्ट करण्यासाठी आवश्यक आदेश प्राप्त करण्यात आले. त्यानुसार अधिकृत पंचनामा व कायदेशीर प्रक्रिया करून पंच, समिती सदस्य आणि अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपूर्ण मुद्देमाल लातूर येथील किर्ती ऑईल मिलच्या फायर बॉयलरमध्ये जाळून नष्ट करण्यात आला. कारवाईदरम्यान कोणतेही प्रदूषण होऊ नये तसेच परिसरातील नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्यात आली होती. यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, अग्निशमन दल, आरोग्य विभाग, रासायनिक विश्लेषकांचे पथक, वैध मापन विभागाचे अधिकारी कर्मचारी यांच्यासह प्रभारी पोलीस उपाधीक्षक (गृह) दत्तात्रय निकम, एम. पोलिस ठाण्याचे निरीक्षक समाधान चवरे, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेचे व पोलीस मुख्यालयाचे पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.लातूर जिल्ह्यात मोठ्या संख्येत राज्यभरातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात. येथे अंमली पदार्थांचा व्यवसाय चांगला चालू शकतो हे व्यवसाईकांनी ओळखले आहे. तरुणांना हेरुन त्यांना या व्यसनात अडकावण्याचा प्रयत्न होत आहे. अनेक मेडीकल स्टोअर्सवर झालेल्या छापेमारीत नशेच्या गोळ्या मिळाल्या आहेत.

### सय्यद नबीला फातिमा हिचे यश

मंठा। प्रतिनिधी



येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू हायस्कूलची विद्यार्थिनी सय्यद नबीला फातिमा एजाज हिला ७१.६० टक्के गुण मिळाले आहे. याबद्दल तिचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तीचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन केले जात आहे.

# शेतातील आखाड्याला आग; आंबा, नारळाच्या झाडासह स्प्रिंकलर सेट जळून खाक

परभणी। प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील सावरगाव तांडा येथे सोमवारी (दि.११) दुपारी भीषण आग लागून महिला शेतकरी संगीता संजय राठोड यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. गट क्रमांक १२७ मधील त्यांच्या शेतातील आखाड्याला अचानक आग लागल्याने परिसरात खळबळ उडाली.

आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण करत शेतातील तीन स्प्रिंकलर सेट पूर्णपणे जळून खाक केले. तसेच आंबा व नारळाची काही झाडे देखील आगीत भस्मसात झाली.आग लागल्याचे



लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न केले. मात्र, तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. या आगीत अंदाजे दीड लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. घटनेमुळे संगीता राठोड यांच्यावर आर्थिक संकट ओढवले असून परिसरातील नागरिकांनीही हळहळ व्यक्त केली आहे. शासनाने तातडीने पंचनामा करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# भरधाव बसची दुचाकीला धडक; दर्शन घेऊन परतताना दांम्पत्य जागीच ठार

परभणी : मानवत तालुक्यातील यशवाडी जवळ शनिवारी दुपारी भीषण अपघात घडला. भरधाव एसटी बसने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात परभणी-मानवत राष्ट्रीय महामार्गावर दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास घडला.

अनिल लक्ष्मण जाधव (वय ५५) आणि आशामती अनिल जाधव (वय ५०, रा. खांडवीवाडी, ता. परतूर, जि. जालना) अशी मृत दांपत्याची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जाधव दांपत्य मानवत तालुक्यातील यशवाडी येथील प्रसिद्ध त्रिमूर्ती हनुमान मंदिरात दर्शनासाठी आले होते. दर्शन, कीर्तन आणि महाप्रसाद आटोपून ते आपल्या दुचाकीवरून (क्र. एमएच २० एफए ७५६८) गावी परतत होते. त्यावेळी परभणीहून बीडकडे जाणाऱ्या भरधाव एसटी बसने (क्र. एमएच १४ एमएच १५६१) त्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की, बसने दुचाकीसह दांपत्याला तब्बल १०० ते १५० फूट अंतरापर्यंत फरपटत नेल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या भीषण अपघातात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. घटनास्थळी रक्ताचा सडा पडल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली. घटनेची माहिती मिळताच मानवत पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक संदीप बोरकर यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी कोल्हा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, मानवत-परभणी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ वर अपघातांची मालिका सुरूच असून वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे

# जुगार अड्ड्यावर धाड; सात जुगारी जेरबंद

नवीन नांदेड। प्रतिनिधी

गोपाळ चावडी ते बाभुळगावकडे जाणाऱ्या रोडवर लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून नांदेड ग्रामीण पोलिसांनी सात जुगारींना जेरबंद केले आहे.

पोलिस अधीक्षक, अविनाश कुमार, अपर पोलिस अधीक्षक, अर्चना पाटील, सुरज गुरव, उप विभागीय पोलीस अधिक्षक प्रशांत शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि ज्ञानेश्वर मटवाड, अर्जुन मुंडे, विष्णु कल्यानकर, संतोष पवार, गवेंद्र सिरमलवार, शेख फय्याज यांनी ९ मे रोजी पेट्रोलिंग करीत असतांना सायंकाळी साडेपाच वाजता गोपनीय माहिती वरून गोपाळ चावडी ते बाभुळगावकडे जाणारे रोडवर लिंबाचे झाडा खाली गोपाळ चावडी येथे धाड टाकली असता काही जण तिर्रट नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. लिस्ट नावाचा जुगार खेळत असतांना मिळून आल्याने सदर इसमांना पकडून दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिसांनी दिनेश लक्ष्मणराव जोंधळे वय ३८ वर्ष रा. गोदावरी ब्रिज जवळ जुना मोंढा नांदेड, गुलाब सदाशिव घोरबांड वय ४३ वर्ष रा. ज्ञानेश्वर नगर सिडको, विजय हरीभाऊ पाटील वय ३५ वर्ग रा. वात्सल्य नगर सोसायटी हाडको, दत्तराव गोविंदराव फुलकाने वय ५६ वर्ग रा. हिंगणी ता. माहूर, संजय बालाजी शिंदे वय ४० वर्ष रा. गोपाळ चावडी, संजय निवृत्ती जोंधळे वय ५० वर्ष रा. नावघाट नांदेड, आनंदा नागोराव हैवतकर वय ४१ वर्ष रा. गोप-ाळचावडी यांच्याकडून पाच दुचाकीसह मोबाईल व नगदी रूपये आणि जुगाराचे साहित्य असा एकूण सुमारे पाच लाखा-हून अधिक रुपयांचा मुद्देमाल ग्रामीण पोलिसांनी जप्त केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.


# जामखेडच्या दोन तरुणांचा रस्ता अपघातात जागीच मृत्यू


## माहिजळगाव-अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात

जामखेड । प्रतिनिधी

माहिजळगाव-अहिल्यानगर महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात जामखेड येथील ॲड. विराज भगवान जायभाय (२५) व सोनू डुचे (२४) या दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, एक जण गंभीर जखमी झाला आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे जामखेड परिसरात शोककळा पसरली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जामखेड येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. भगवान जायभाय यांचे सुपुत्र ॲड. विराज जायभाय हे पुणे येथील शिवाजीनगर न्यायालयात वकिली व्यवसाय करत होते. मोठ्या भावाच्या विवाहासाठी ते जामखेड येथे आले होते. विवाह सोहळा आटोपल्यानंतर





दि. ११ रोजी रात्री विराज जायभाय, सोनू डुचे व पुणे येथील एक मित्र असे तिघेजण पुण्याकडे निघाले होते. ते (एमएच १७ एझेड ३२४२) क्रमांकाच्या आय-२० कारमधून प्रवास करत असताना माहिजळगाव जवळील आंबिलवाडी परिसरातील वळणावर चालकाचा अंदाज चुकल्याने भरधाव कार रस्ता सोडून शेतात घुसली. त्यानंतर वाहनाने अनेक पलट्या घेतल्या आणि भीषण अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की विराज जायभाय व सोनू डुचे यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांच्यासोबत असलेला पुणे येथील मित्र गंभीर जखमी झाला आहे. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावून आले. त्यांनी तातडीने गाडीत अडकलेल्या तरुणांना बाहेर काढून जामखेड येथे संपर्क साधत घटनेची माहिती दिली. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून जामखेड शहरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी जामखेड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले आहेत. दरम्यान, ॲड. विराज जायभाय यांच्या निधनाबद्दल जामखेड तालुका वकील संघाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तसेच दुःखात सहभागी होत दोन दिवस न्यायालयीन कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती वकील संघाचे ॲड. अमीर खान यांनी दिली.

# पालिका कर्मचाऱ्याच्या निषेधार्थ परंडा शहर बंद

धाराशिव। प्रतिनिधी

परंडा नगर परिषद कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षकाने जातीवाचक अपशब्द वापरून मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याच्या निषेधार्थ शनिवारी परंडा शहर बंद ठेवण्यात आले. या बंदला शहरातील व्यापारी, मुस्लिम समाज व नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शहरातील मुख्य बाजारपेठ, मंडई पेठ, टिपू सुलतान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महारराणा प्रताप चौक तसेच महात्मा फुले चौक परिसरात कडकडीत बंद पाळण्यात आला होता. समस्त मुस्लिम समाज व नागरिकांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.



संबंधित कर्मचाऱ्याला तत्काळ निलंबित करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तसेच योग्य कारवाई न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. निवेदनात म्हटले आहे की, २६ एप्रिल रोजी परंडा शहरातील नागरिक निसार मुजावर यांनी शहरात दोन-तीन दिवसांपासून कचरा घंटागाडी आली नसल्याबाबत मोबाईलवरून विचारणा केली होती. त्यावेळी नगर परिषद कर्मचाऱ्याने अश्लील भाषेत बोलून जातीवाचक शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याचे नागरिकांनी सांगितले. परंडा हे सर्वधर्मीय नागरिक गुण्यागोविंदाने नांदणारे शांतताप्रिय शहर असून, अशा प्रकारच्या वक्तव्यामुळे धार्मिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. नागरिकांच्या समस्या सोडवण्याऐवजी जाती-धर्मावरून अपमानास्पद भाषा वापरणे ही गंभीर बाब असल्याचे मुस्लिम समाजाच्या वतीने नमूद करण्यात आले. या प्रकरणी यापूर्वी जिल्हाधिकारी, तहसीलदार, नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांना निवेदने देण्यात आली होती. मात्र अद्याप कोणतीही निलंबनाची अथवा कठोर कारवाई न झाल्याने मुस्लिम समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी परंडा शहर बंद ठेवण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यावर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा आणखी तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मुस्लिम समाजाच्या वतीने देण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# मुख्याधिकाऱ्यांना जिवे मारण्याची धमकी ; पालिका कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना त्यांच्या कॅबिनमध्ये घुसून दोघांनी जीवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ केल्याचा प्रकार घडला. या प्रकरणात पोलीसांना पत्र देऊनही अद्यापपर्यंत गुन्हा दाखल झालेला नाही. सदरील घटनेच्या निषेधार्थ नगर पालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आज काम बंद आंदोलन केले. दरम्यान मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधून या प्रकरणात आपण पोलीस प्रशासनाकडे लेखी पत्र पाठवले आहे, या प्रकरणात योग्य ती कारवाई होईल, कोणत्याही कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारे



काम बंद आंदोलन करू नये अशा सूचना करत आंदोलन थांबवले.

या प्रकरणात पोलीसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून धमकी देणाऱ्याविरूध्द कठोर कारवाई करावी, या पुढे अशा प्रकारच्या घटना घडू नये यासाठी उपाययोजना कराव्यात अशा मागणीचे निवेदन सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिले.

बीड नगर पालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आज काम बंद आंदोलन केले. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या घटनेचा निषेध नोंदवत सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नगर पालिकेच्या मुख्य गेटसमोर एकत्रित येऊन घोषणाबाजी करून निषेध नोंदवला. मुख्याधिकारी हे नगर पालिकेचे वरिष्ठ अधिकारी आहेत. मात्र त्यांच्याच दालनात जाऊन त्यांना अशा प्रकारे धमकी दिली जात असेल तर सर्व सामान्य कर्मचाऱ्यांचे काय ? असा प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. सदरील प्रकरणात पोलीसांनी तातडीने धमकी देणाऱ्या शेख निजाम अमीन, शेख इम्रान निजाम (दोघे रा. मसरत नगर, बीड) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करून त्यांना अटक करून त्यांच्याविरूध्द कडक कारवाई करावी अशी मागणी यावेळी कर्मचाऱ्यांनी केली. बीड येथील संबंधित वडिल आणि मुलगा यांच्या प्रॉपर्टीचा विषय होता. पीटीआर नोंद करण्यावरून त्यांचा आपसात विषय झाला होता. तो त्यांचा कौटूंबिक प्रश्न होता. त्यावर आम्ही त्यांना लेखी पत्र दिले होते. त्यामध्ये त्यांचा विषय संपलाही होता. परंतू त्यांनी आपापसात गुन्हे दाखल केले होते. त्यांच्या त्या पारिवारिक गुन्ह्याचा ते इथे येऊन जाब विचारत होते.

### नागरीकांनी कामाबद्दल प्रश्न विचारावेत परंतू ते सनदशीर मार्गाने : मुख्याधिकारी फडसे

नागरीकांनी कामाबद्दल प्रश्न विचारावेत त्यासाठी सनदशीर मार्ग असणे आवश्यक आहे.आमच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून जर काही गोष्टी चुकीच्या घडल्या तर त्यात त्यावर आमची जी काही कार्यालयीन पध्दती आहे त्यानुसार आम्ही कारवाई करत असतो. ती कारवाई करा म्हणणे चुकीचे नाही परंतू कार्यालयात येऊन अरेरावी करणे, दमदाटी करणे, जोरात ओरडणे, कार्यालयीन कामकाजात हस्तक्षेप निर्माण होईल असे वर्तन करणे हे चुकीचं आहे. हे मी त्यांना त्यादिवशीही सांगितले होते. परंतु ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. त्यांनी आरडा ओरड केली. कामकाजात अडथळा आणला त्याबद्दल रितसर तक्रार देखील केली आहे. आज त्यांच्याविरूध्द आम्ही एफआयआर देखील नोंद करणार आहोत असे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी सांगितले.

## ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन

बीड । प्रतिनिधी

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांसाठी सातत्याने आणि वारंवार पाठपुरावा केलेला आहे; करत आहे. मात्र, ग्रामविकास विभागाकडून आणि प्रशासनकाडून कसलाच प्रतिसाद मिळत नाही. यामुळे आज सोमवारी (दि.११) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू करण्यात आले. मागण्या मान्य झाल्या नाही तर ८ जून २०२६ रोजी पासून नागपूर येथे मुख्यमंत्री यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.





अभय यावलकर समितीच्या शिफारसी स्वीकारून अंमलबजावणी करा, किमान वेतनाची मुदत फेब्रुवारी २०२३ ला संपुष्टात आल्यामुळे नवीन किमान वेतनाच्या दराप्रमाणे मासिक वेतन द्या. वाढीव थकबाकी द्या, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी घातलेली उत्पन्न अट रद्द करा. केवळ वसुलीची अट शिथील करून कुचकामी ठरत आहे, लोकसंख्येचा जाचक आकृतीबंध रद्द करा, राहणीमान /विशेष भत्ता १००% शासन तिजोरीतूनच द्या, संचालक, पंचायत राज, पुणे यांच्या पत्राप्रमाणे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन थेट बँके मार्फत द्या, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भरती करण्यापूर्वी आणि सेवेतून कमी करण्यापूर्वी जिल्हा परिषदेची परवानगी घ्या यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी अनेकदा निवेदने देऊनही प्रशासन दखल घेत नसल्याने आयटक जिल्हा कौन्सिल, बीड व आयटक सलग्न ग्रामपंचायत कामगार कर्मचारी संघटना, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. याची दखल घेत माइण्या मान्य केल्या नाही तर मुख्यमंत्री यांच्या नागपूर कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनात आयटक चे पदाधिकारी, ग्रामपंचायत कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## मध्यरात्री भीषण अग्नितांडव, इलेक्ट्रॉनिक्स आणि फर्निचरचे दुकान भस्मसात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील बाहय वळण रस्त्यावरील बँक कॉलनी परिसरात मध्यरात्री लागलेल्या एका भीषण आगीत लहू आणि अंकुश सुरवसे या दोन भावांनी अत्यंत कष्टाने उभा केलेले 'विराट इलेक्ट्रॉनिक्स अँड भांडी फर्निचर' हे दुकान, गोडाऊन आणि फर्निचर तयार करण्याचा कारखाना आगीच्या भक्ष्यस्थानी पडला आहे. या घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली आहे. आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू असले तरी अद्याप ती



पूर्णपणे आटोक्यात आलेली नाही.सध्या लग्नसराईचा हंगाम असल्याने ग्राहकांसाठी दुकानामध्ये नवीन इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडी आणि तयार फर्निचरचा मोठा साठा करून ठेवण्यात आला होता. तसेच कारखान्यातही नवीन फर्निचर बनवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. मात्र, मध्यरात्री अचानक लागलेल्या या भीषण आगीने सर्व स्वप्नांची राख रांगोळी केली असून यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप अधिकृतपणे स्पष्ट होऊ शकले नाही. अनेक वर्षांच्या मेहनतीतून उभा केलेला हा व्यवसाय डोळ्यादेखत भस्मसात होताना पाहून सुरवसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला आहे.

## सत्याचा विजय : निष्पक्ष चौकशीनंतर माझ्यावरील तक्रार निकाली– राख

पाटोदा। प्रतिनिधी

येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कथित गैरप्रकारांबाबत सोशल मीडियावर पोस्ट केल्याप्रकरणी किशोर भीमराव राख यांच्या विरोधात करण्यात आलेली पोलीस तक्रार प्रशासनाने निकाली काढली आहे. पोलीस तपासात राख यांचा हेतू सार्वजनिक हिताचा असल्याचे निष्पन्न झाल्याने हा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे 'सत्याचा विजय' झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.काय आहे प्रकरण ?सावरगाव (सोने) येथील रहिवासी किशोर राख यांनी दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली होती. या पोस्टमुळे प्रशासनाची बदनामी होत असल्याचा दावा करत काही संबंधित व्यक्तींनी त्यांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल केली होती.निष्पक्ष चौकशीनंतर तक्रार बंदया तक्रारीनंतर पोलीस अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी प्रकरणाची सखोल चौकशी केली. चौकशीदरम्यान, ही पोस्ट केवळ सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी आणि सार्वजनिक हितासाठी असल्याचे दिसून आले. कोणताही गुन्हा घडल्याचे पुरावे न मिळाल्याने अखेर ही तक्रार निकाली काढण्यात आली.प्रतिक्रिया''मी केवळ जनहितासाठी आवाज उठवला होता.

## दुय्यम निबंधक कार्यालयात दलालांचा सुळसुळाट;शेतकरी व नागरिकांची लूट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील दुय्यम निबंधक कार्यालयात काही दलाल व त्यांना साथ देणारे कर्मचारी यांच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, दस्त नोंदणी, खरेदी-विक्री व्यवहार, सातबारा संबंधित कागदपत्रे आणि इतर नोंदणी प्रक्रियेसाठी अधिकृत शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त रक्कम मागितली जात असल्याची तक्रार आहे. कार्यालय परिसरात खुलेआम दलाली सुरू असून, नागरिकांना थेट शासकीय काम करण्याऐवजी दलालांकडे जाण्यास भाग पाडले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य लोकांना मोठा आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी जिल्हाधिकारी, जिल्हा निबंधक व राज्य शासनाकडे केली आहे. याबाबत तातडीने कारवाई न झाल्यास नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

## मिलियाकडून शासनाची फसवणूक -तावरे!

बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील मिलिया प्राथमिक शाळेने २०१० पासून शहराच्या वेगवेगळ्या भागात अनधिकृत पणे भाग शाळा सुरु केल्या आहेत. या शाळा अनधिकृत असल्याचा अहवाल २०१० साली तत्कालीन उपशिक्षणाधिकारी यांनी दिल्यानंतर देखील मिलिया कडून या शाळा गेल्या सोळा वर्षांपासून सुरूच आहेत. विशेष म्हणजे या शाळेवर शिक्षकांची नेमणूक करून त्यांचे बोगस शालार्थ आयडी काढण्याचा उद्योग या संस्थेने केला आहे. या शाळेवर आणि संस्थेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मनसे चे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी केली आहे. बीड शहरासह जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालय, उच्च महाविद्यालय असलेल्या अंजुमन इशात ए तालीम या संस्थेने मिलिया या नावाने शाळा, कॉलेज सुरु केले आहेत.

मात्र या संस्थेने बीड शहरात प्राथमिक शाळा च्या नावाने शाहूनगर, बालेपीर, गांधीनगर, भालदारपुरा अशा वेगवेगळ्या भागात भाग शाळा सुरु केल्या आहेत. या भाग शाळा अनधिकृत असल्याचा अहवाल २०१० साली तत्कालीन उपशिक्षणाधिकारी हिरालाल कराड यांनी दिला होता. गेल्या १६ वर्षात या भाग शाळा बंद करण्याबाबत शिक्षण विभागाने कसलीच कारवाई केली नाही. प्रत्येकवेळी संस्थेने लक्ष्मी दर्शनाचा वापर करून शिक्षण विभागाला मॅनेज केले आणि शासनाची फसवणूक केली. मिलिया शाळेच्या सुरु असलेल्या एका भाग शाळेवर कारवाई करण्याबाबत पान २ वर

## दहा दिवसात मंडळ बरखास्त करा अन्यथा जनआंदोलन -शेख नदीम

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ विरोधात राज्यभरात नाराजीचा सूर वाढताना दिसत आहे. ठराविक मुद्द्यांवरच काम करून महत्त्वाच्या प्रकरणांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत समाजसेवक शेख नदीम यांनी दहा दिवसात मंडळ बरखास्त करण्याची मागणी केली आहे.

त्यांनी आरोप केले आहे की ''क्लोज फॉर ऑर्डर'' म्हणून वर्गीकृत अनेक प्रकरणे महिनोनमहिने प्रलंबित आहेत. या प्रकरणांमध्ये कोणतीही ठोस कार्यवाही होत होत नाही. काही निवडक आणि कमी महत्त्वाच्या विषयांवर मात्र तत्परतेने निर्णय घेतले जात ते आश्चर्यजनक. चार सदस्य मंडळ स्वतःची मनमानी करून मंडळाची प्रतिमा मालिनी कधीच आहे यावर अर्थाची कारवाई होणे गरजेचे आहे.

त्यांनी आपल्या पत्रकात म्हटले आहे की मंडळ जाणून बुजून भू-माफियांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना अभय देण्याचे काम करत आहे राज्यातील अनेक भूमाफिया मंडळातील पदाधिकाऱ्यांसोबत अनेक फोटोमध्ये दिसून आले आहे ज्यामुळे हा मंडळ भूमाफिया यांची कटपुतली असल्याची दिसून येत आहे. त्यांनी म्हटले आहे की बीड जिल्ह्यातील समनापूर आणि संगीन मस्जिद घोटाळा प्रकरणात अद्याप ठोस कारवाई का झाली नाही, याशिवाय, मंडळाच्या प्रशासनातील काही निर्णय देखील वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. बीड जिल्हा कार्यालयाचे स्थलांतर अशा ठिकाणी करण्यात आले आहे, जिथे संबंधित कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक संबंध असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. शहराच्या सुलभ कनेक्टिव्हिटी असलेल्या ठिकाणाऐवजी अशा ठिकाणाची निवड का करण्यात आली, याची चौकशी करावी.

समाजसेवक शेख नदीम यांनी मंडळात मोठा भ्रष्टाचार केला जात असल्याचा आरोप करत लवकरच या संपूर्ण प्रकरणाचा भांडाफोड करण्याचा इशारा दिला आहे.

त्यांनी राज्य शासनाला थेट आव्हान देत म्हटले आहे की, दहा दिवसांच्या आत मंडळ बरखास्त करून केंद्र सरकारच्या नियमांनुसार नवीन मंडळाची नियुक्ती करण्यात यावी. अन्यथा, मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरोपांची सत्यता तपासून योग्य ती कारवाई केली जाणार का, की हे प्रकरण आणखी चिघळणार, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

## सौताडा विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रामनाथ सानप; व्हॉइस चेअरमनपदी दिगंबर उबाळे बिनविरोध

पाटोदा । प्रतिनिधी

सौताडा येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमन व व्हॉइस चेअरमन पदाच्या निवडीत एकमताचा आदर्श पाहायला मिळाला. लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या सूचनेनुसार चेअरमनपदी रामनाथ सानप तर व्हॉइस चेअरमनपदी दिगंबर लालू उबाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे परिसरातील कार्यकर्ते व सभासदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

निवड प्रक्रियेदरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, सरपंच



बाळासाहेब घुले तसेच सोसायटीचे सर्व संचालक मंडळ तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांच्या सहमतीने व एकमताने ही निवड पार पडल्याने गावातील सहकार क्षेत्रात एकोप्याचा संदेश देण्यात आला.

नवनिर्वाचित चेअरमन रामनाथ सानप यांनी निवडीनंतर बोलताना सभासदांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे सांगितले. शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी सोसायटीच्या माध्यमातून विविध विकासात्मक योजना राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच सोसायटीची आर्थिक घडी अधिक मजबूत करून सभासदांना वेळेवर कर्जपुरवठा, शेतीसाठी आवश्यक सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले.

व्हॉइस चेअरमनपदी निवड झालेल्या दिगंबर लालू उबाळे यांनीही सर्व संचालक व सभासदांचे आभार मानले. सोसायटीच्या पान २ वर

## तेलगाव कारखाना परिसरात वेश्या व्यवसायावर पोलिसांची धाड; २ आरोपी अटकेत

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या तेलगाव साखर कारखाना परिसरात सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायावर दिंद्रुड पोलीस आणि बीड येथील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने संयुक्तरीत्या मोठी कारवाई केली. या कारवाईत तीन महिलांची सुटका करण्यात आली असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांना तेलगाव कारखाना परिसरात अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानंतर शुक्रवारी सायंकाळी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान संबंधित ठिकाणाहून तीन महिलांची सुटका करण्यात आली.

या प्रकरणी मिना सुर्यवंशी आणि अनंत कोथिंबीरे या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. महिलांना वेश्याव्यवसायासाठी प्रवृत्त करणे तसेच भाग पाडल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही संयुक्त कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि महेश भोसले, पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव आणि पवनसिंग जंघाले यांच्या पथकाने केली. अटक करण्यात आलेल्या आरोपींना धारूर न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यानंतर आरोपींची जिल्हा मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली

## घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते तातडीने द्या; खा.बजरंग सोनवणेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र; जिल्ह्यात ५४ हजार घरकुलाचे हप्ते रखडले

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसह इतर विविध घरकुल योजनांतर्गत घरकुलांचे काम हाती घेतलेल्या सुमारे ५४ हजार लाभार्थ्यांचे हप्ते गेल्या अनेक महिन्यांपासून रखडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हप्ते न मिळाल्याने गरिबांच्या स्वप्नातील घरांची बांधकामे अर्धवट अवस्थेत असून, हक्काच्या निवाऱ्यासाठी लाभार्थ्यांना आता पावसाळ्याच्या तोंडावर उघड्यावर राहण्याची भीती सतावत आहे. या गंभीर प्रश्नी बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र लिहून जिल्ह्यासाठी विशेष निधीची मागणी केली असून, हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची विनंती केली आहे.



पत्रात म्हटले आहे, बीड जिल्ह्याची ओळख ही कष्टकरी आणि मजुरांची आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे पक्के घर मिळेल, या आशेने हजारो कुटुंबांनी घरकुलांच्या कामाला सुरुवात केली. मात्र, प्रशासकीय उदासीनता आणि निधीची कमतरता यामुळे आज जिल्ह्यातील जवळपास प्रत्येक गावात सरासरी ५० पेक्षा अधिक घरकुल प्रकरणे प्रलंबित आहेत. अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर घराचे पायाभरणी किंवा भिंतींचे काम पूर्ण झाले, मात्र त्यानंतरचा दुसरा हप्ता वेळेत न मिळाल्याने ही बांधकामे तिथेच थबकली आहेत. काही दुर्दैवी लाभार्थी तर अशा आहेत की, ज्यांची निवड होऊनही त्यांना अद्याप पहिल्या हप्त्याची प्रतीक्षा आहे.

खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात लाभार्थ्यांच्या आर्थिक ओढाताणीवर बोट ठेवले आहे. घरकुलाचे काम अर्धवट राहू नये, यासाठी ग्रामीण भागातील गरीब लाभार्थ्यांनी खासगी सावकारांकडून कर्ज काढून किंवा नातेवाईकांकडून उसनवारी करून, तसेच दुकानातून उधारीवर साहित्य आणून बांधकामे रेटली. मात्र, आता सरकारकडून मिळणारा निधीच थांबल्याने त्यांच्यावर कर्जाचा डोंगर उभा राहत आहे. पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यातील 'या' भागात पाण्यासाठी रणकंदन, २७ वर्षे जुन्या पाणीपुरवठा योजनेविरोधात 'हंडा मोर्चा'

**पुणे । प्रतिनिधी**

सासवड शहराला गेल्या अनेक वर्षांपासून भेडसावत असलेल्या तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर अखेर नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे शिवसेनेकडून आज भव्य 'जनआक्रोश हंडा मोर्चा' काढण्यात आला. पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेची शिक्षा सासवडकरांना का भोगावी? असा सवाल उपस्थित करत महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि विविध भागातील रहिवाशांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभाग घेतला.

सासवड शहरातील सध्याची पाणीपुरवठा योजना तब्बल २७ वर्षांपूर्वीची असून वाढती लोकसंख्या आणि शहराचा विस्तार लक्षात घेता ती पूर्णपणे अपुरी ठरत असल्याची तीव्र भावना नागरिकांनी व्यक्त केली. वारंवार होणाऱ्या गळती, तांत्रिक बिघाड आणि विस्कळीत नियोजनामुळे अनेक भागांत पाच-पाच दिवस





पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. नगरपरिषदेकडून 'दिवसाआड पाणी'चे आश्वासन दिले जात असले तरी प्रत्यक्षात ५ ते ३ दिवस लागत आहेत उन्हाळ्यात संपूर्ण यंत्रणाच कोलमडल्याचे चित्र पाहायला मिळत असल्याचे शिवसेनेचे शहरप्रमुख मिलिंद इनामके यांनी सांगितले.

पाण्यासाठी महिलांना हंडे घेऊन तासन्तास रांगा लावाव्या लागत असून अनेकांना विकतचे पाणी घेण्याची वेळ आली आहे. काही भागांत दूषित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी नगरसेवक प्रितम म्हेत्रे यांनी व्यक्त केली. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून २०२४ मध्ये मंजूर झालेल्या १४३ कोटी रुपयांच्या नवीन पाणीपुरवठा योजनेचे काम अद्याप सुरू झाले नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन निधी उपलब्ध असतानाही प्रशासकीय दिरंगाई आणि राजकीय श्रेयवादामुळे काम रखडल्याचा आरोप शिवसेनेचे गटनेते मंदार गिरमे आणि नगरसेवक बाळासाहेब भिंताडे यांनी केला.

सोमवारी सकाळी महात्मा फुले चौक येथून मोर्चाला सुरुवात झाली. मेन रोड व शिवतीर्थ चौक मार्गे हा मोर्चा सासवड नगरपरिषद कार्यालयावर धडकला. १४३ कोटींच्या योजनेचे काम तातडीने सुरू करा, नियमित व शुद्ध पाणीपुरवठा करा आणि शहरासाठी कायमस्वरूपी जलनियोजन करा अशा मागण्यांचे फलक हातात घेऊन आंदोलकांनी घोषणाबाजी केली. सासवडकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. पाण्यासारख्या मूलभूत प्रश्नावर आता नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागत आहे, ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

# शिक्षकांची माहिती अपलोड करा अन्यथा प्रवेश बंद; पुणे विद्यापीठाचा कॉलेजांना इशारा

**पुणे । प्रतिनिधी**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये पन्नास टक्के शिक्षक असल्याची माहिती बीओडी पोर्टलवर अपलोड करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी मुदत दिली होती. परंतु अनेक महाविद्यालयांनी संबंधित माहिती भरलेली नाही. त्यामुळे अखेर विद्यापीठाने येत्या १८ मे पर्यंत अंतीम मुदतवाढ दिली आहे. दिलेल्या मुदतीमध्ये शिक्षकांची माहिती अपलोड करून न देणाऱ्या महाविद्यालयांची २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाचे प्रथम वर्षाचे प्रवेश थांबवले जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विद्यापीठ अनुदान आयोग तसेच शासनाने निर्धारित केलेल्या किमान मानकानुसार ज्या संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये ३१ मार्च २०२६ पर्यंत नियमित आणि तदर्थ स्वरूपात नियुक्त झालेल्या आणि विद्यापीठाची मान्यता असलेल्या शिक्षकांची किमान संख्या एकत्रितपणे ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल अशा संलग्नित महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेश शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये थांबविण्यात यावेत, असा निर्णय विद्यापीठाच्या विद्यापरिषदेने २४ जानेवारी २०२६ घेतला आहे. शिक्षक नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता दिनांक १५ एप्रिल २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतरही ९ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु, असे निदर्शनास आले आहे की अद्याप बऱ्याच महाविद्यालयांची, मान्यताप्राप्त परिसंस्थांची माहिती बीओडी पोर्टलवर ऑनलाईन स्वरूपात अपलोड करणे बाकी आहे. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांचे नुकसान टाळण्यासाठी त्यांना १८ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून, त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही त्वरित पूर्ण करावी. माहिती अपलोड करण्याची प्रक्रिया पूर्ण न केल्यास महाविद्यालयांना काहीही म्हणायचे नाही, असे समजून महाविद्यालयातील, परिसंस्थेमधील प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याचा निर्णय घेण्यात येईल, असेदेखील विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पुण्याचे 'अमनोरा पार्क टाउन' झाले 'एलपीजी मुक्त क्षेत्र'; १० हजार घरांमध्ये पीएनजी

**पुणे । प्रतिनिधी**

अधिक सुरक्षित आणि शाश्वत नागरी पायाभूत सुविधांच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून, 'अमनोरा पार्क टाउन'ला अधिकृतपणे 'एलपीजी फ्री झोन' अर्थात 'एलपीजी मुक्त क्षेत्र'म्हणून घोषित करण्यात आले आहे. यासंबंधीची घोषणा अमनोरा टाउनशिप मध्ये नुकत्याच संपन्न झालेल्या एका विशेष कार्यक्रमादरम्यान करण्यात आली.

यावेळी अमनोरा पार्क टाउन विकसित करत असलेल्या सिटी कॉर्पोरेशचे व्यवस्थापकीय संचालक अनिरुद्ध देशपांडे, एमएनजीएलचे कुमार शंकर, मेजर शंकर करजगी उपस्थितीत होते. 'अमनोरा पार्क टाउन' हे 'एलपीजी फ्री झोन' म्हणून घोषित




होणे ही बाब ऊर्जा वापरामध्ये झालेला एक प्रगतीशील बदल दर्शवणारे एक महत्वाचे पाउल असून आधुनिक निवासी संकुलांमध्ये पाईपद्वारे नॅचरल गॅसचा पुरवठा करण्याचे महत्व अधोरेखित करते.


वर्ष २०११ पासून पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा व स्वीकारण्याच्या बाबतीत अमनोरा पार्क टाउनने लक्षणीय प्रगती दर्शविली आहे. आज, या टाउनशिपने सर्व सदनिकांमध्ये १०० टक्के पाईपद्वारे गॅसचा पुरवठा करण्यात येतो. येथे असलेल्या १० हजार हून अधिक सदनिकांमध्ये पाइपद्वारे गॅसची जोडणी करण्यात आली आहे. हे स्थित्यंतर ऊर्जा क्षेत्रातील एका सुयोनियोजित आणि कार्यक्षम बदलाचे प्रतिबिंब असण्याबरोबरच सुरक्षा, सोय आणि पर्यावरणीय शाश्वततेशी देखील सुसंगत आहे.

अमनोरा आणि एमएनजीएल यांनी 'एलपीजी फ्री झोन'चे एक आदर्श मॉडेल विकसित केले आहे. जे इतरांसाठी देखील दिशादर्शक ठरेल. अमनोरा ने घनकचरा व्यवस्थापन क्षेत्रातही यशस्वी प्रकल्प राबवले आहेत. त्याचप्रमाणे, कचऱ्यापासून ऊर्जा निर्मितीसाठी 'कॉम्प्रेस्ड बायो गॅस' प्रकल्प कार्यान्वित केला आहे. या प्रकल्पाचा विस्तार करण्याची अमनोराची योजना आहे. विशेषतः महाराष्ट्र शासनाचे 'कॉम्प्रेस्ड बायो गॅस' धोरण, २०२६ अंतर्गत भविष्यातील इंधनाचा विकास करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. अशा प्रकारचे सर्व प्रयत्न राष्ट्राच्या ऊर्जा सुरक्षा धोरणात मोलाचे योगदान देतात.

# सूर्य दिसत नसला तरी चंद्राच्या पाठीशी असतो...'; बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉयची सुनेत्रा पवार यांच्यासाठी मराठीतून पोस्ट

**पुणे । प्रतिनिधी**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोठ्या मताधिक्यानं ऐतिहासिक विजय मिळवला. बारामतीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आमदारकीसाठी तब्बल २ लाख १८ हजार ८०६ मतं मिळवून मोठा विजय मिळवला. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीत पोटनिवडणूक घेण्यात आली. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी बारामतीची पोटनिवडणूक लढवली. महत्त्वाची बाब म्हणजे, या निवडणुकीत तब्बल २३ उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उभे होते. तरीही सुनेत्रा




पवार यांनी मोठ्या मताधिक्यानं विजय मिळवत पुन्हा एकदा पवार म्हणजेच, बारामती... हे सिद्ध केलं. अशातच आता सुनेत्रा पवार यांच्या विजयावर बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय यानं भावूक पोस्ट शेअर केली आहे. बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय यानं मराठीतून पोस्ट करत सुनेत्रा पवार यांचा उल्लेख अजितदादांच्या योग्य वारसदार, असा केला आहे.

बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉय यानं एक ट्वीट शेअर केलंय. त्या ट्वीटमध्ये त्यानं सुनेत्रा पवार यांच्यासोबतचा एक फोटो पोस्ट केलाय. त्या फोटोमध्ये त्यानं लिहिलंय की, सुनेत्रा वहिनी, अजित दादांनी उभारलेला भक्कम वारसा आज बारामतीकरांच्या प्रेमातून पुन्हा एकदा दिसून आला. तुमचा हा ऐतिहासिक विजय महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून अभिमानास्पद नव्या पर्वाची सुरुवात आहे आणि हे यश फक्त तुम्हीच मिळवू शकत होतात...पुढे बोलताना विवेक ओबेरॉय म्हणालाय की, दादांची जनतेसाठीची कामं, लोकांवरील प्रेम आणि कठीण प्रसंगातही खंबीरपणे उभं राहण्याची ताकद यामुळेच ते खरे जननेते ठरलेत. आज जनतेनं त्यांच्या अर्धांगिनीवर दाखवलेला विश्वास हेच सिद्ध करतो की, त्या वारशाच्या योग्य वारसदार तुम्हीच आहात. तुमच्या या नव्या प्रवासासाठी मनःपूर्वक शुभेच्छा. महाराष्ट्रासाठी हा काळ निश्चितच सुवर्णयुग ठरेल, असा विश्वास आहे...

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावर आत्महत्येचा प्रयत्न; पोलिसांच्या समजुतीनंतर आंदोलन मागे

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी दुपारी एक व्यक्ती आत्महत्या करण्याच्या इराद्याने पाचव्या मजल्यावरील जाळीवर चढल्याने काही काळ खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. मिळालेल्या माहितीनुसार, राम शिवाजी पाचकाळे (वय ३०, रा. भोर, पुणे) यांनी राजगड पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अदखलपात्र प्रकरणात दखलपात्र गुन्हा नोंद करण्याची मागणी केली होती.



आपल्या मागणीसाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाचव्या मजल्यावरील जाळीवर बसून आंदोलन सुरू केले. यामुळे कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच बंडगार्डन पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच अग्निशमन दलाचे अधिकारीही घटनास्थळी उपस्थित होते. संबंधित प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिल्यानंतर राम पाचकाळे यांचे समाधान झाले. यानंतर त्यांनी आपले आंदोलन मागे घेत सुरक्षितपणे खाली उतरले. पुढील चौकशी व आवश्यक कारवाईसाठी पोलिसांनी त्यांना पोलीस ठाण्यात आणले असून पुढील प्रक्रिया सुरू आहे.

# प्रसिद्ध उद्योगपतीचा हॉटेलमध्ये मृतदेह; विष प्राशन करून आत्महत्येचा संशय

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील सॅलिसबरी पार्क परिसरातील ६१ वर्षीय उद्योगपतीचा मृतदेह शनिवारी दुपारी डेक्कन परिसरातील आपटे रोडवरील एका हॉटेलच्या खोलीत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. संबंधित उद्योगपती शुक्रवारपासून बेपत्ता होते. त्यांच्या कुटुंबीयांनी संपर्क होत नसल्याने स्वारगेट पोलीस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी हॉटेल कर्मचाऱ्यांनी डेक्कन जिमखाना पोलिसांशी संपर्क साधत एका ग्राहकाने शुक्रवारी हॉटेलमध्ये चेक-इन केल्यानंतर खोलीचा दरवाजा उघडत नसल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. दरवाजा उघडल्यानंतर संबंधित उद्योगपती मृतावस्थेत आढळले. डेक्कन जिमखाना पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीशा निंबाळकर यांनी सांगितले की, हॉटेलच्या खोलीत विविध ठिकाणी उलटी झाल्याचे दिसून आले. प्राथमिक तपासात त्यांनी विष प्राशन केल्याचा संशय आहे. परिस्थितीवरून हा आत्महत्येचा प्रकार असल्याचे प्रथमदर्शनी वाटत असून याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांना खोलीतून एक चिठ्ठीही सापडली असून ती उद्योगपतींनी लिहिल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या चिठ्ठीत काही आर्थिक अडचणींचा उल्लेख असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मात्र, नातेवाईकांच्या मदतीने या चिठ्ठीची सविस्तर पडताळणी करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# गीतरामायण रचलं ती पुण्यातील 'पंचवटी' पाडण्याचा डाव; ग दि माडगूळकरांच्या नातवाची धक्कादायक पोस्ट

**पुणे । प्रतिनिधी**

मराठी साहित्यातील ज्येष्ठ प्रसिद्ध कवी, गीतकार, लेखक आणि अभिनेता ग दि माडगूळकर यांचं घर पाडण्यासाठी डाव आखला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग दि माडगूळकर यांची 'पंचवटी' पाडण्यास त्यांचे नातू सुमित्र माडगूळकर यांनी विरोध केला आहे. जवळच्या नातेवाईकांकडून त्यांना धमकी दिली जात असल्याचा आरोप सुमित्र यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी धक्कादायक दावा केला आहे.

ग दि माडगूळकर यांचे नातू सुमित्र माडगूळकर यांनी सोशल मीडियावर दिलेल्या माहितीनुसार, ग दि माडगूळकरांचे पुण्यातील शिवाजीनगरमधील पंचवटी निवासस्थान पाडण्यास विरोध करत असल्याने नातेवाईकच त्रास देत आहेत. जवळचे नातेवाईक आणि आजूबाजूच्यांना ही वास्तू पाडून बिल्डरला द्यायची आहे आणि त्यात पैसे उकळायचे आहे. याला आमचा विरोध आहे आणि महत्त्वाचं म्हणजे ज्या वास्तूमध्ये गदिमा



यांचं वास्तव्य होतं. ही वास्तु तशीच राहावी अशी आमची इच्छा आहे, असं सुमित्र माडगूळकर यांनी सांगितल आहे. मी हे घर पाडायला विरोध करीत असल्यामुळे मला धमक्या येत आहे. माझ्या कुटुंबीयांना त्रास दिला जात आहे, असाही दावा सुमित्र माडगूळकर यांनी केला आहे. ज्येष्ठ साहित्यिक लेखक गदिमा माडगूळकर यांचे पुण्यात पंचवटी नावाचे निवासस्थान आहे. याच निवासस्थानात बसून त्यांनी गीत रामायण लिहिलं होतं. गदिमांचे नातू सुमित्र मांडगुळकर यांनी पोस्ट करत ही वास्तू पाडू किंवा विकू देणार नाही अशी भूमिका घेतल्याने धमकी येत असल्याची माहिती दिली आहे.

# पुण्यातील बुधवार पेठेत पोलिसांचं कोम्बिंग ऑपरेशन, रेड लाईट एरियातील 'त्या' ५ महिलांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बुधवार पेठच्या रेड लाईट परिसरातील फरासखाना पोलिसांनी बांगलादेशी महिलांवर मोठी कारवाई केली आहे. भारतात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या ५ बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतलं आहे. विशेष म्हणजे, गेल्या ११ महिन्यांत पुणे पोलिसांनी पकडलेल्या बांगलादेशी नागरिकांची संख्या आता ९४ वर पोहोचली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अवैधरीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत फरासखाना पोलीस स्टेशनने बुधवार पेठ परिसरात रात्री १ ते सकाळी ९ वाजेपर्यंत कोंबींग ऑपरेशन केलं. पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, माचिस बिल्डिंग परिसरात काही बांगलादेशी महिला अवैधरित्या राहत आहेत. या माहितीच्या आधारे पोलिसांनी छापा टाकून ५ महिलांना ताब्यात घेतले. या प्रकरणाच्या तपासा दरम्यान, या महिला बांगलादेशातून अवैध मार्गाने भारतात आल्याचे समोर आले. त्या बुधवार पेठ परिसरात वेश्याव्यवसाय करून उदरनिर्वाह करत असल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली. तसेच त्यांच्याकडे बांगलादेशी नागरिकत्वाचे पुरावेही आढळून आले असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# पुण्यात मध्यरात्री मोठी कारवाई! आंतरराज्यीय टोळीत राजकीय पक्षाचा शहराध्यक्ष; मोठं रॅकेट उघड

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यामधून एक मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यातील हडपसर औद्योगिक वसाहतीत मध्यरात्री सुरू असलेल्या कॉपर केबल चोरीच्या मोठ्या रॅकेटचा वानवडी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत पर्दाफाश केला आहे. या कारवाईत आठ जणांना अटक केली आहे. यामध्ये एका राजकीय पक्षाच्या शहराध्यक्षाचेही नाव आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, पुणे शहरातील बसंल बीएसएनएल कॉपर केबल चोरीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हडपसर औद्योगिक वसाहतीत मध्यरात्री



सुरू असलेल्या कॉपर केबल चोरीच्या मोठ्या रॅकेटचा वानवडी पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करत पर्दाफाश केला आहे. ड्रेनेज लाईनचे झाकण उघडून बीएसएनएलच्या भूमिगत मौल्यवान कॉपर केबल्स क्रेनच्या सहाय्याने बाहेर काढणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला पोलिसांनी रंगेहाथ पकडले. या धडक कारवाईत तब्बल ८० लाख ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून नऊ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. धक्कादायक बाब म्हणजे या आरोपींमध्ये पुण्यातील राजकीय पक्षाच्या शहराध्यक्षाचाही समावेश आहे. प्रविण बागुल असे या आरोपीचे नाव असून तो वंचित बहुजन आघाडीचा पदाधिकारी आहे. तो वंचितच्या झोपडपट्टी सुरक्षा समितीचा पुणे शहराध्यक्ष आहे. अस्लम सगीर खान, आरिफ कुंदुखाँ खान (वय ४०, रा. उत्तरप्रदेश), शोहेब हारुण खान (वय २५, रा. उत्तरप्रदेश), सलमान इद्रीस मलिक (वय ३३, रा. दिल्ली), नरेश कुमार श्रीशिवचरण (वय ४३, रा. हरियाणा), नवी मोहम्मद शान मोहम्मद (वय ३५, रा. उत्तरप्रदेश), अनिस अन्सारी मोहम्मद गियासुद्दीन (वय २२, रा. हडपसर, पुणे), अफाक अन्सारी रफिक अन्सारी (वय २२, रा. हडपसर, पुणे) आणि प्रवीण दादासाहेब बागुल (वय ३३, रा. हडपसर, पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

# शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुण्यात; स्थळाची घोषणा १४ जूनला

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र साहित्य परिषदच आगामी शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करणार असल्याचे रविवारी (दि. १०) झालेल्या साहित्य महामंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब झाले आहे. पुढील बैठक येत्या १४ जून रोजी पुण्यात होणार असून, या बैठकीत साहित्य संमेलनाचे स्थळ ठरणार आहे. या संमेलनासाठी सहसंयोजक म्हणून पुणे पुस्तक महोत्सव आणि पुणे नगर वाचन मंदिर यांच्याकडून सहआयोजकाचा प्रस्ताव देण्यात आला आहे. साहित्य महामंडळाच्या रविवारी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती महामंडळाचे अध्यक्ष योगेश सोमण यांनी पत्रकार परिषदेत दिली. साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर या वेळी उपस्थित होते.

साहित्य महामंडळाचे प्रभारी अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सोमण, महाळंक आणि निफाडकर यांनी साहित्य महामंडळाचे पदाधिकारी म्हणून सूत्रे स्वीकारली. स्वामी यांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने त्यांच्या जागी पुरुषोत्तम सप्रे (भोपाळ) यांची महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड केली आहे. तसेच, या वेळी साहित्य संमेलन स्थळ निवड समितीची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रमुख कार्यवाह, कोषाध्यक्ष यांच्यासह प्रतिभा सराफ (मुंबई मराठी साहित्य संघ), रामचंद्र काळुंखे (मराठवाडा साहित्य परिषद) आणि लखनसिंह कटारे (विदर्भ साहित्य संघ) यांचा समावेश आहे.